# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०३/२००८.** **दिनांक २४.०२.२००८**
**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी २.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे रविवार दिनांक २४ फेब्रुवारी, २००८ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा. नं. एसएसएस -वशी-०४- २५७५ -२००८, दि.१८.२.२००८ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे, यांची राष्ट्रीयकल परिषदेच्या राज्य शासन नियोजित ऑस्ट्रेलियाच्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाल्याने ते या कालवधीमध्ये परदेश दौऱ्यावर असल्याने सदरहू सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सदरहू सभा रविवार दिनांक २४ फेब्रुवारी, २००८ रोजी दुपारी २.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात माउपाध्यक्ष श्री. शंकरराव गेणूजी कोल्हे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष
०२. मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग
०३. मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे
०४. मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव
०५. मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे
०६. मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक
०७. मा.कॅप्टन सुरेख वासुदेवा
०८. मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर
०९. मा.डॉ.पी.एल.तिवारी

मा.श्री.किशोर रा. मोरे
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.उपाध्यक्ष श्री. शंकरराव गेणूजी कोल्हे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष, मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.सौ.सुमित्रा कैलास कोते यांनी दूरध्वनीवरुन तसेच मा.श्री समि खतीब, मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय यांनी फॅक्स पत्राद्वारे कळविले त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं. ०१ नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमा खर्च तक्ता जानेवारी- २००८.**

**(ब) माहे जानेवारी, २००८ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे जानेवारी,२००८ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे जानेवारी, २००८ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. १६९** (A) माहे जानेवारी- २००८ मधील जमा रु १८,७१,७१,६४४.११ आणि खर्च रुपये ९,२९,४९,४०४.१४ चा तक्ता, माहे जानेवारी- २००८ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्च रुपये ३,८९,०१९.०० खर्चाचा तक्ता, दिनांक ०५.०२.२००८ अखेरीस रु २,४८,४०,०४,२२४.००, गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, माहे जानेवारी- २००८ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह एकूण रुपये ६,७५,२०,०७०.०० व देणगीचा तक्ता, माहे जानेवारी- २००८ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा रुपये २,२२,७२५/- चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०२. माहे जानेवारी,२००८ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. १६९ (A)** माहे जानेवारी,२००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान रु.८४,६५,७८१/- चा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०३. साईनाथ रुग्णालयातील गरीब रुग्णांना माहे जानेवारी,२००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. १६९ (B)** माहे जानेवारी,२००८ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना अंतररुग्ण रुपये १,१५,६३२/- बाह्य रुग्ण रु.६०,२६७/- थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ५४,४५०/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

**विषय नं. ०२ श्री साईबाबा रुग्णालयाकरीता मॉरच्युरी केबीन खरेदीबाबत**

**निर्णय क्र.१७०** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५/११/२००६ निर्णय क्र. ९१९ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयाकरीता लागणाऱ्या १० ड्रॉवरचे मॉरच्युरी कॅबीन खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.१५,००,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २९/०१/२००५ निर्णय क्र. १८ नुसार रु. ५,००,०००/- पेक्षा जास्त खर्च असलेल्या खरेदीसाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन जाहिर निविदा मागविण्यात याव्यात. त्यानुसार आलेल्या निविदा मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये उघडण्यात येऊन संबंधितांशी चर्चा तथा वाटाघाटी करुन खरेदीबाबत निर्णय घेणेत यावा. विशिष्ट ब्रॅन्ड/कंपनीचाच माल/साहित्य खरेदी करावयाचे झाल्यास थेट उत्पादक कंपनीकडून दरपत्रके मागविण्यात यावीत व संबंधितांशी चर्चा तथा वाटाघाटी करुन मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय घेणेत यावा, असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार संस्थानचे खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन ब्लु स्टार/गोदरेज कंपन्या करीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु जाहिरातीस अनुसरुन एकही निविदा प्राप्त झालेली नाही. तेंव्हा सदरचे खरेदीकामी मा.विश्वस्त, वैद्यकिय संचालक, प्रशासकिय अधिकारी यांनी संबंधीत मॉरच्युरी कॅबीन असलेल्या ठिकाणी भेट देऊन समक्ष पहाणी करुन त्याचे दरपत्रक आणून खरेदी करणेबाबत खरेदी विभागाने त्यांचे दि.२४/०४/२००७ चे टिप्पणी अन्वये सुचविलेले होते.

श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये Blue Star कंपनीचे ४ ड्रावरचे मॉरच्युरी कॅबीनेट सध्या उपलब्ध आहे. ते सध्या सुस्थितीत असून सदर कंपनीचे ड्रावर चांगल्या प्रकारचे आहेत. त्यामुळे सदरचे मॉरच्युरी कॅबीनेट इतर रुग्णालयात समक्ष जाऊन पाहणी करण्याची आवश्यकता नाही असे वाटते.

१० ड्रावर असलेले मॉरच्युरी कॅबीनेट Blue Star कंपनी बनवत नसल्याचे समजते. तेंव्हा श्री साईबाबा रुग्णालया करीता सध्या ६ ड्रावरचे Blue Star कंपनीचे मॉरच्युरी कॅबीनेट खरेदी केले तर त्यासाठी अंदाजे रु.४,५०,०००/- पर्यंत खर्च येईल.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २९/०१/२००५ निर्णय क्र. १८ नुसार विशिष्ट ब्रॅन्ड/ कंपनीचाच माल/साहित्य खरेदी करावयाचे झाल्यास थेट उत्पादक कंपनीकडून दरपत्रके मागविण्यात यावीत व संबंधितांशी चर्चा तथा वाटाघाटी करुन मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय घ्यावा, असे ठरले आहे.

त्यानुसार उपरोक्त मॉरच्युरी कॅबीनेट खरेदीकामी Blue Star कंपनीकडून तसेच त्यांचे अधिकृत विक्रेते यांचेकडून इकडील पत्र क्र. १८३८७ दि. १७/११/२००७ अन्वये दि.३०/११/२००७ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. परंतु त्यास अनुसरुन एकच कोटेशन प्राप्त झाले होते, त्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र. १९७१० दि.१४/१२/२००७ अन्वये पुन्हा स्मरणपत्र देऊन कोटेशन पाठविणेबाबत कळविण्यात आले. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले होते.

१) मे. गारवा एंटरप्रायजेस, नाशिक (बंद कोटेशन)
२) मे. ऑरचिड कुलींग ॲन्ड क्लिनींग, नाशिक (बंद कोटेशन)
३) मे. कोल्डस्टार एंटरप्रायजेस, नाशिक (बंद कोटेशन)
४) मे. योरको सेल्स प्रा.लि., मुंबई (प्रशासन शाखेकडून टपालातून उघडून मिळाले)

वरीलप्रमाणे प्राप्त कोटेशन मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१३/०१/२००८ रोजीच्या सभेत समक्ष उघडण्यात आलली आहेत दि.१४/०१/२००८ रोजी सदर मॉरच्युरी कॅबीनेटकरीता मे. मेगास्टार इंजिनीअरींग, पुणे यांना कोटेशन मागणीचे पत्र नसतांना त्यांनी स्वत:हून कोटेशन पाठविलेले आहे व सदरचे कोटेशन हे प्रशासन शाखेकडून दि.११/०१/२००८ रोजी टपालातून उघडून मिळालेले आहे. ते देखील विचारात घेतलेले आहे. त्यानुसार प्राप्त कोटेशनचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन तो सोबत सादर केला आहे.

मॉरच्युरी कॅबीनेट खरेदीकामी दर प्राप्त झालेल्या कोटेशन धारकांना आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेले होते. चर्चा/वाटाघाटीअंती त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| S.N | Description | Qty. | Megastar Engineering, Pune | Garwa Enterprises, Nashik | Coldstar Enterprises, Nashik | Orchid Cooling & Cleaning Pvt.Ltd., Nashik | Yorco Sales Pvt.Ltd., Mumbai |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Mortuary Cabinet 6 Body | 1 | 607387.50 (Basic Cost) | 511044.00 (Basic Cost) | 540000.00 (Basic Cost) | 528000.00 (Basic Cost) | 530000.00 |
| | | | Make - Blue Star | Make - Blue Star | Make - Blue Star | Make - Blue Star | Make- Yorco YSI-177 |
| | Width 2946 mm | | 22473.00 (Installation and commissioning of the Mortuary cabinet | 39326.00 (Charges for Installation and commissioning of the Mortuary cabinet | 40000.00 (Charges for Installation and commissioning of the Mortuary cabinet | 41500.00 (Charges for Installation and commissioning of the Mortuary cabinet | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Total in Rs. 629860.50 | Total in Rs. 550370/- | Total in Rs. 580000/- | Total in Rs. 569500/- | Total in Rs. 530000/- |
| | Rate After Negotiation | | 504000.00 | 533859.00 | 562600.00 | Absent | 496080.00 |
| | | | Model - BMC 610 | Model - BMC 610 | Model - BMC 610 | Model - BMC 610 | |
| | ▪ Depth 2362 mm | | Capacity Six Body | | | | Environment Friendly - CFC Free Refrigerant, PUF insulated. Inner chamber S.S. Temperature Range From - 2 Deg C ro + 5 Deg C, Capacity 6 Bodies. |
| | ▪ Height 1745 mm | | Insulation 80 mm Thk. Prefabricated PUF panels with inside and outside skin of prepainted GI. With SS front. | | | | |
| | ▪ Height with Cooling Unit and PCC Platform 2215 mm | | Ambient Temp + 40 Deg. C | | | | |
| | ▪ Refrigeration System - Unitary Type RTU - 10 | | Inside Temp. (+) 2 to 6 Deg. C | | | | |
| | ▪ Temperature Range +2 to 6$^0$C | | Refrigeration Unit - Blue Star make Unitary type Refrigeration Unit with Hermetic Compressor and matching evaporator (Serviceability, maintenance & approach to the Ref. Unit is easy, without disturbing cadavers & carriage assembly) | | | | |
| | ▪ Power Supply 230 ± 10% / Single Phase / 50 Hz | | Refrigerant - R 22 | | | | |
| | | | Dimensions (mm) 3165 W x 2402 D x 1785 H | | | | |
| | | | Ref. System (Roof Top Mounting Unitary) Capacity - 6000 & 10000 btu / hr | | | | |
| | | | Standard Accessories- | | | | |
| | | | ▪ Vapour Proof | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Incandescent Lamp | | | | |
| | | | ▪ Electronic Temperature Indicator with digital display | | | | |
| | | | ▪ 3 piece, Telescopic Action, GI Powder coated Carriage Assembly. | | | | |
| | | | ▪ One piece S/S Moutuary Tray with Tubular Edge & Handle | | | | |
| | | | Power Supply 230 V / Single Phase / 50 Hz | | | | |

यावर सविस्तर चर्चा होऊन Blue Star कंपनीचे Mortury Cabinet मे. मेगास्टार इंजिनिअरींग. पुणे यांचेकडून रु. ५,०४,०००/- इतक्या किंमतीत खरेदी करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ०३** **श्रीसाईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयातील फर्निचर व रेक्झीन मॅट्रेसेस खरेदी बाबत**

**निर्णय क्र.१७१** श्रीसाईनाथ रुग्णालयातील कार्यालयीन फर्निचर खरेदीकामीचा अंदाजे खर्च रु.५,१२,३०१.८०/- चा प्रस्ताव व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता फोर सिटर बेंच खरेदीचा अंदाजे खर्च रु.२,४३,०००/- चे प्रस्तावास दि.२५/११/२००६ चे मा. व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.९०७ व ९२१ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

तसेच श्री साईबाबा रुग्णालयाचे कॅज्युएल्टी वॉर्ड व शस्त्रक्रिया गृह इत्यादी ठिकाणी १२ नग रेक्झीन मॅट्रेसेस खरेदीचा अंदाजे खर्च रु.५०,९५२/- चा प्रस्ताव दि.३१/०३/२००७ चे मा. वैद्यकिय समिती सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन, सदर खरेदी विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवुन करावी असे ठरले.

त्यानुसार उपरोक्तप्रमाणे तीनही खरेदीकामी एकत्रितपणे वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.२५/०४/२००७ ते दि. ०८/०५/२००७ अखेर संस्थानचे शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि. १०/०५/२००७ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन चार निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

तसेच यापुर्वी सदर फर्नीचर खरेदीकामी दि.१५/०२/२००७ ते २३/०२/२००७ अखेर जाहिरात देऊन दि.२६/०२/२००७ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन दोन निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

दोन्ही वेळेच्या जाहिरातीस अनुसरुन खालीलप्रमाणे ६ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे -

१) मे. इको-फोम प्रॉडक्टस् ॲन्ड सर्व्हिसेस, मुंबई
२) मे. खिरा स्टिल वर्क्स प्रा. लि., अहमदाबाद
३) मे. जनक हेल्थकेअर प्रा. लि., मुंबई
४) मे. उषा ट्रेडींग कं., नाशिक
५) मे. रविराज डिसप्ले सिस्टीम, पुणे
६) मे. मेट्रो मेटल इंडस्ट्रीज, औरंगाबाद

उपरोक्त ०६ बंद निविदा मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१३/०१/२००८ रोजीच्या सभेत समक्ष उघडण्यात आल्या होत्या त्याचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. सदर तुलनात्मक तक्त्यात अ.नं.६ करीता तीन निविदा धारकांचे दर प्राप्त झालेले आहे, अ.नं.१,२,७ करीता दोन निविदा धारकांचे दर प्राप्त झालेले आहे तर अ.नं. ३ साठी फक्त एकाच निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहे. तर अ.नं. ४,५ साठी ४ निविदा धारकांचे दर प्राप्त झालेले आहे सदरहू निविदाधारकांना त्यांनी निविदेमध्ये नमूद केलेल्या मालाचा नमुना शिर्डी येथे समक्ष बोलावून घेऊन तो मा. व्यवस्थापन समिती सभेतील सदस्यांना दाखवून समक्ष चर्चा/वाटाघाटी करणे बाबत दि.१३/०१/२००८ चे वैद्यकिय समिती सभेमध्ये निर्णय झालेला आहे.

त्यानुसार सदरहू निविदा धारकांना आजचे सभेपुढे समक्ष नमूना घेऊन चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यानी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| S. N | Name of Furniture | Qty | Janak health-care, Mumbai | Rate After Negoti-ation | Usha Trading Co., Nashik | Raviraj Display System, Pune | Rate After Negotia-tion | Metro Metal Ind., Aurangabad | Khira Steel Works Pvt. Ltd, Ahmedbad | Eco Foam Product, Mumbai | Rate After Negotia-tion |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **Revolving Chair : -** | 20 | N.Q. | | 3314.00 | N.Q. | | N.Q. | 8516.25 | | |
| | Width : 650mm. Depth : 650mm. BackHt.: 620mm. Overall Ht : 990mm. | | | | Euromic Make Revolving Chair Model No.- D-546 | | | | Width : 650mm. Depth : 650mm. BackHt.: 620mm Overall Ht. :990mm | | |
| | | | | | 6803.00 | | | | | | |
| | | | | | Godrej Make Revolving Chair Model No.- PCH-7032 Size - 660mmW x 650mm D x 930H | | | | | | |
| 2 | **Revolving Chair :-** | 15 | N.Q. | | 4820.00 | N.Q. | | N.Q. | 8813.25 | | |
| | Width : 620mm. Depth : 620mm. Back Ht.730mm. Overall Ht : 1140mm. | | | | Euromic Make Revolving Chair Model No.- C-534 | | | | Width : 620mm. Depth : 620mm. Back Ht.730mm. Overall Ht : 1140mm. | | |
| | | | | | 6327.00 | | | | | | |
| | | | | | Godrej Make Revolving Chair Model No.- PCH-7024 | | | | | | |
| 3 | **Health check - examination table :-** (Upholstered Top ) | 10 | 12118.50 | No Disc-oount | N.Q. | N.Q. | | N.Q. | N.Q. | | |
| | MS Tubular construction machine pressed double bent, MS sheet, Two section top of approx | | MS Tubular construction machine pressed double bent, MS sheet, Two section top of approx | | | | | | | | |
| | Size : 1830mm L x 610 mmW x 760 mmH . | | Size : 1830mm L x 610 mmW x 760 mmH . | | | | | | | | |
| | Headrest Adjustable on rachet. Rubber feet. Protreated & Powder coated. Supplied in kdc. Fixed upholstered top. Height | | Headrest Adjustable on rachet. Rubber feet. Pretrea-ted & Powder coated. Supplied in kdc. with Fixed upholstered top. Height 825 mm. | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 825 mm. | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| 4 | **Steel cup board with Glass Door :-** | 15 | N.Q. | | 10873.00 | 10208.00 | No discount | 5555.00 | 14977.00 | | |
| | 6'6"x3'x1' 6" Gauge of Steel 18 having four adjustable shelves. | | | | Maximaa Make Glass Door Cup Board Model No.- MTCLC - (Glass Door) | Model - BCO 1 - Bookcase Single Frantage 6'6"x3'x 1'6" Gauge of Steel. 18 having four adjustable shelves. Side, Top, Bootom and shelves will be made 18 gauge CRC sheet. Back will be made of 0.8mm CRC sheet. 4mm Glass will be used for doors Painted. | | Model - Metro M - 513 | Khira Glass Door Cupboard Model : 1719G :- Size 1981mm x 914mm x 483mm | | |
| | | | | | 15901.00 | 8437.00 | No disco-unt | | | | |
| | | | | | Gorej Make Glass Door Cup Board Model No.- STPL -4 SH Glass Door Size - 198 | Model - BCO 1 - Bookcase Single Frantage 6'6"x3'x1' 6" Having four adjustable shelves. Side, Top, Bottom will be made of 0.7mm gauge CRC sheet. Doors & shelves will be made of 0.6mm CRC sheet. 4mm Glass will be used for doors Painted. | | | | | |
| 5 | **Slotted Angle Racks :-** | 25 | N.Q. | | 4190.00 | 8978.00 | No discount | 4985.00 | 25029.00 | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Consisting 4 angles & 1 back & 12 partition making 18 Boxes. Size : 1900 x 900 x 450mm. (As per Enclosed Sketch ) | | | | Maximaa Make slotted angle racks with 7 pannel & 3 side close with 12 parttation plate. Size : 2000 x 900 x 450 mm | Consisting 4 angles (angle size35mm x 35mm x3mm) & 12 partition (partition 20 Gauge CRC sheet) making 18 Boxes. Size: 1900 x 900 x 450mm. Shelves will be made of 1mm CRC sheet. No doors. Painted. Model - Special | | (As per Enclosed Sketch ) but No side Sheet | Consisting 4 angles & 1 back & 12 partition making 18 Boxes.Size : 1900 x 900 x 450mm. | | |
| 6 | **4 Seater chair :-** | 30 | N.Q. | | 3900.00 | N.Q. | | 3375.00 | 9112.50 | N.Q. | |
| | (Seat & Back side will be perforated) | | | | Euromic make perforated Chair Model No 2 Seater Size 935W X 580D X 800H | | | Metro M-55 | Seat and back side will be perforated | | |
| | | | | | 5200.00 | | | | | | |
| | | | | | Euromic make perforated Chair Model No 3 Seater Size 1435W X 580D X 800H | | | | | | |
| | | | | | 4694.00 | | | | | | |
| | | | | | Godrej make perforated Chair Model No 2 Seater Size 935W X 580D X 800H | | | | | | |
| | | | | | 6055.00 | | | | | | |
| | | | | | Model No 3 Seater Size 1435W X 580D X 800H | | | | | | |
| 7 | **Real Latex Mattress with Raxin Cover for Stretcher Trolley.** | 12 | 5571.81 | No Discoount | N.Q. | N.Q. | | N.Q. | N.Q. | 2194.00 | No discount |
| | (Along with 2 nos. Trolley Belt.) | | Rexine Covered 25mm thick rubber mattress for Stretcher Trolley | | | | | | | Size : 72 x 22 1" Real Latex Mattress with Raxin Cover for Stretcher Trolley.with 2 | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | Trolley Belt. | |

यावर सविस्तर चर्चा होऊन अ.नं. १ प्रती नग रु. ६८०३/- , अ.नं. २ प्रती नग रु.६३२७/- , अ.नं. ४ प्रती नग रु.१५९०१/- , अ.नं. ५ प्रती नग रु.४११०/- , अ.नं. ६ करीता रुपये ६०५५/- या दराने खरेदी करावी तत्पूर्वी सदर फर्निचरची नाशिक येथे जाऊन, समक्ष पाहणी करुन त्यातील योग्य असे फर्नीचर/साहित्य मे. उषा ट्रेडींग कं, नाशिक यांचेकडून Godrej कंपनीचे खरेदी करण्यात यावे. अ.नं. ३ प्रती नग रु. १२११८.५० मे. जनक हेल्थकेअर, मुंबई यांचेकडून खरेदी करण्यात यावे, तर अ.नं. ७ प्रती नग रु. २१९४/- मे. इको फोम मॅट्रसेस, मुंबई यांचेकडून खरेदी करण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ०४** **वार्षिक औषधे खरेदीमध्ये दर प्राप्त न झालेली औषधे/सर्जिकल साहित्य तसेच दैनंदिन वापरासाठी लागणारी तातडीची औषधे खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत .**

**निर्णय क्र.१७२** श्रीसाईनाथ रुग्णालय व श्रीसाईबाबा रुग्णालयासाठी सन २००७-२००८ या वर्षाकरीता लागणाऱ्या वार्षिक औषधे/सर्जिकल साहित्य खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात येऊन सदरच्या निविदा मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०७/२००७ चे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन त्यावर रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांच्या शिफारशीनुसार सदर औषधे/सर्जिकल साहित्य खरेदीकामी दि.०९/१०/२००७ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

सदर वार्षिक औषधे खरेदीमध्ये एकूण ८४ औषधे/सर्जिकल साहित्याकामी दर प्राप्त झालेले नसून सदरचे औषधे/सर्जिकल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहेत. त्यासाठी अंदाजे रु.८,२९,४३३.९०/- इतका खर्च अपेक्षित आहे. याशिवाय दैनंदिन वापरासाठी बरीचशी औषधे जी बाजारात नव्याने उपलब्ध झालेली असतात, तर काही औषधे काही विशिष्ट आजारासाठी लागतात त्यामुळे त्याचा खप/वापर देखील खूपच कमी असतो त्यामुळे ती मोठ्या प्रमाणात खरेदी करुन ठेवता येत नाही व ती विशिष्ट आजारासाठी खरेदी करणे गरजेचे असते अशी विविध प्रकारची औषधे/सर्जिकल साहित्य वेळोवेळी तातडीने खरेदी करावी लागतात. अशा प्रकारची तातडीची औषधे/सर्जिकल साहित्य खरेदी करणेकामी अधिकृत विक्रेते/पुरवठा धारकांकडून सिलबंद कंपनीचे दरपत्रके मागवून ती मा. व्यवस्थापन समिती सभा/मा. वैद्यकिय समिती सभेपुढे सदरचे दरपत्रक उघडून सदरच्या औषधांचे दर १ वर्षाकरीता निश्चित करुन सदरचे औषधे/सर्जिकल साहित्य अवश्यकतेनुसार सदर अधिकृत विक्रेते/पुरवठा धारकांकडून वेळोवेळी खरेदी करता येतील याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२२/०९/२००७ चे सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यास निर्णय क्रमांक ७२५ (ब) अन्वये मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी दैनिक सकाळ- पुणे (टुडे), दैनिक लोकमत - मुंबई, दैनिक गावकरी - नाशिक, दैनिक लोकसत्ता-पुणे या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०७/०१/२००८ ते दि.१७/०१/२००८ अखेर निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.१९/०१/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. त्यानुसार संस्थानच्या मुंबई कार्यालयात ३० निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या त्यापैकी २२ निविदा विक्री होऊन १५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. शिर्डी कार्यालयात ५० निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या त्यापैकी २५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात एकूण ४० निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | Advance Technology, Thane | 02 | Austin Health Care, Pune |
| 03 | Cadila Healthcare Ltd., Ahmedabad | 04 | ChetnaEnterprises, Ahmednagar |
| 05 | Critical Care Systems, Pune | 06 | Emcure Pharmaceuticals, Pune |
| 07 | Franco-Indian Pharmaceuticals | 08 | Galpha Laboratories Ltd., Mumbai |
| 09 | Gaurav Medical & General, Shrirampur | 10 | Hansraj Nayyar Medical India, Mumbai |
| 11 | Hem Agencies, Kopargaon | 12 | Inga Laboratories, Mumbai |
| 13 | Ipca Laboratories Ltd., Mumbai | 14 | IVES Drugs (India) Pvt. Ltd., Indore |
| 15 | Kanchan Drugs, Pune | 16 | Karwa Agencies, Sangamner |
| 17 | Khandelwal Laboratories Pvt.Ltd., Mumbai | 18 | Kiran Agencies, Nagpur |
| 19 | Macledos Pharmaceuticals Ltd., Mumbai | 20 | Nagarjun Marketing Services, Nashik |
| 21 | Neha Agencies, Ahmednagar | 22 | Pharmacea Link, Pune |
| 23 | Raman & Weil Pvt. Ltd., Mumbai | 24 | Rudraksha Pharma, Nashik |
| 25 | S.S. Pharma, Mumbai | 26 | Saikrupa Medicals, Kopargaon |
| 27 | Sandeep Agencies, Kopargaon | 28 | Sanjay Agencies, Ahmednagar |
| 29 | Sanjivani Agency, Ahmednagar | 30 | Sanjivani Medical Store, Ahmednagar |
| 31 | Shreya Enterprises, Ahmednagar | 32 | Sidhant Marketing, Pune |
| 33 | Surgilink, Shrirampur | 34 | Surya Surgi Pharma, Nashik |
| 35 | Suyash Pharmaceuticals, Shrirampur | 36 | Synergy Diagnostics Pvt.Ltd., Thane |

| | | | |
|---|---|---|---|
| 37 | Tirupati Enterprises, Pune | 38 | Universal Traders, Pune |
| 39 | Varad Enterprises, Nashik | 40 | Vizag Pharma Industries, Visakhapatnam |

उपरोक्तप्रमाणे ४० सिलबंद निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन, सदरहू निविदासादरकर्त्यांना चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

त्यानुसार एकूण १८ निविदासादरकर्ते चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित होते. समक्ष वाटाघाटीअंती त्यांनी खालीलप्रमाणे सुट देऊ केलेली आहे.

| Sr. No | Name of Party | Discount % | Sr. No. | Name of Party | Discount % |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Advance Tehnology, Thane | 0% | 10 | Rudraksha Pharma, Nashik | 0% |
| 2 | Chetna Enterprises, A'Nagar | 1% | 11 | Raman & Weil Pvt]Ltd., Mumbai | 5% |
| 3 | Franco-Indian Pharmaceuticals Pvt. Ltd., Mumbai | 0% | 12 | S.S. Pharma, Mumbai | 3% |
| 4 | Hansraj Nayyar Medical India, Mumbai | 5% | 13 | Saikrupa Medicals, Kopargaon | 0% |
| 5 | Hem Agencies, Kopargaon | 1% | 14 | Sanjivani Medical Store, A'Nagar | 5% |
| 6 | IVES Drugs (India) Pvt. Ltd., Indore | 2% | 15 | Suyash Pharmaceutic Shrirampur | 0% |
| 7 | Karwa Agencies, Sangamner | 0% | 16 | Surya Surgi Pharma, Nashik | 0% |
| 8 | Kiran Agencies, Nagpur | 10% | 17 | Tirupati Enterprises, Pune | 0% |
| 9 | Nagarjun Marketing Services, Nashik | 0% | 18 | Synergy Diagnostics Pvt. Ltd., Thane | 2% |

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त निविदामधील औषधे आवश्यकतेनुसार/संबंधीत डॉक्टरांचे मागणीनुसार ३० एप्रिल २००८ पर्यंत खरेदी करण्यात यावीत, तसेच वार्षीक औषधे (सन २००८-०९) करीता प्रस्ताव मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ०५** **फूड सर्व्हिस ट्रॉली खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.१७३** दि.०६.०१.२००७ चे मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र. ६९ (३) अन्वये ०४ नग फुड सर्व्हिस ट्रॉली कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.१,५५,२०५/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती. त्यानुसार दि.१०.०२.२००७ अखेर एकूण ८ अधिकृत विक्रेत्यांकडुन कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन ३ विक्रेत्यांचे कोटेशन प्राप्त झालेली होती.

प्राप्त कोटेशनमध्ये केवळ दोनच कोटेशनधारकाचे दर प्राप्त झाले होते. त्यामुळे सदर खरेदीकामी फेर कोटेशन मागविण्याचा प्रस्ताव दि.०२.०४.२००७ च्या टिपणीन्वये मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. त्यानुसार इकडील पत्र क्र.७०६३ दि.०३.०५.२००७ अन्वये एकुण १५ अधिकृत विक्रेते यांचेकडून दि.१५.०५.२००७ अखेर कोटेशन मागविण्यात आलेले आहेत. त्यास अनुसरुन ७ अधिकृत विक्रेत्यांचे कोटेशन प्राप्त झालेली होती.

परंतु कोटेशन मागविताना ट्रॉली खरेदीकामी दिलेले (Specification) मध्ये असणाऱ्या पॉटची उंची हि फारच कमी असल्यामुळे आपणास पाहिजे त्या फुड सर्व्हिस ट्रॉली मिळणार नव्हती. सदरचे ०४ नग फुड सर्व्हिस ट्रॉली खरेदीकामी रु.१,५५,२०५/- इतक्या रकमेची मा.व्यवस्थापन समिती सभेची मान्यता आहे. तेव्हा याकामी आपणास आवश्यक उंचीचे पॉटसाठीचे (Specification) देऊन त्याप्रमाणे सुधारित ०४ ऐवजी ०२ नग ट्रॉली खरेदी करण्याचा फेर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यासाठी अंदाजे रु.९१,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र.१४९६३ दि.१८०९.२००७ अन्वये एकुण ८ अधिकृत विक्रेते यांचेकडून दि.२९.०९.२००७ अखेर कोटेशन मागविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन ३ अधिकृत विक्रेत्यांचे कोटेशन प्राप्त झालेले होते. ते खालीलप्रमाणे-

०१. मे. के.बी.इलेक्ट्रॉनिक्स, मुंबई.

०२. मे. जोवी फार्मासुटीकल्स, मुंबई.

०३. में. निखिल एंटरप्रायजेस, मुंबई.

वरीलप्रमाणे प्राप्त ०३ बंद कोटेशन मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१०.०१.२००८ चे सभेत समक्ष उघडण्यात आलेली असून त्याचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. प्राप्त तुलनात्मक दरांचे तक्त्यानुसार प्रत्येक पुरवठाधारकाचे ट्रॉलीचा नमुना पाहिल्यानंतर खरेदी करावी, असे मत आहे.

तरी फुड सर्व्हिस ट्रॉली खरेदीकामी दर प्राप्त झालेल्या कोटेशनधारकांना ट्रॉलीचा नमुना घेऊन आजचे सभेपुढे समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| Sr.No | Description | Qty. | K.B.Electronics, Mumbai | Jovi Pharmaceutical, Mumbai | Nikhil Enterprises, Mumbai |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Food Service Trolley** | 2 | 45500.00 | 56113.75 | 52931.25 |
| | **Rate After Negotiation** | | **44000.00** | **No Discount** | **Absent** |
| | Overall Size - 750mm x 700mm x 850 +100mm | | Overall Size - 750mm x 700mm x 850 +100mm | Overall Size - 750mm x 700mm x 850mm | Overall Size - 750mm x 700mm x 850mm |
| | Four Bins each having capacity of 20 Lts. | | **Four Bins each having capacity of 20 Lts.** | **Four Bins** | **Four Bins of 20 Lts.capacity** |
| | One drawer to keep Chapaties | | One drawer to keep Chapaties | One drawer, One shelf at the bottom | One drawer |
| | One Shelf at the bottom to stake empty plates | | One Shelf at the bottom to stake empty plates | Heavy duty Castors 4" | 4" Castors for mobility |
| | Without heating element or glass wool | | Without heating element or glass wool | All S.S. | All S.S. |
| | Heavy duty cators 4" for easy mobility | | Heavy duty cators 4" for easy mobility | | |
| | Sturdy structure of 304 grade S.S. | | Sturdy structure of 304 grade S.S. | | |
| | All dull finish S.S. | | All dull finish S.S. | | |
| | | | 49500.00 | 60737.50 | 57656.25 |
| | | | Overall Size - 750mm x 700mm x 850 +100mm | Overall Size - 750mm x 700mm x 850mm | Overall Size - 750mm x 700mm x 850mm |
| | | | **Six Bins each having capacity of 20 Lts.** | **Six Bins** | **Six Bins of 20 Lts.capacity** |
| | | | One drawer to keep Chapaties | One drawer, One shelf at the bottom | One drawer |
| | | | One Shelf at the bottom to stake empty plates | Heavy duty Castors 4" | 4" Castors for mobility |
| | | | Without heating element or glass wool | All S.S. | All S.S. |
| | | | Heavy duty cators 4" for easy mobility | | |
| | | | Sturdy structure of 304 grade S.S. | | |
| | | | All dull finish S.S. | | |

यावर सविस्तर चर्चा होऊन मे. के. बी. इलेक्ट्रॉनीक्स, मुंबई यांचेकडून प्रती नग रु. ४४,०००/- या दराने ५ नग फूड सर्व्हिस ट्रॉली खरेदी करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ०६** **संस्थान वाहनांचा विमा नुतनीकरण करणेकामी आलेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.१७४** दि.१०/०१/२००८ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयान्वये वाहन विभागातील ४४ वाहनांचा दि.०१/०४/२००८ ते दि.३१/०३/२००९ अखेर विमा नुतनीकरण करावयाचा असलेने राष्ट्रीयकृत कंपन्या, दि.न्यु इंडिया ॲश्यूरन्स, कं. लि., दि. ओरीएण्टल इंश्योरेंस कं. लि., युनाइटेड इंडिया इन्शूरेन्स कं. लि., नेशनल इन्श्योरेन्स कं. लि. यांचेकडून दरपत्रके (कोटेशन) मागविणे व या कामी अंदाजे रू.१० लाख मात्रचे खर्चा बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता त्यास मान्यता मिळालेली आहे. दि.१०/०१/२००८ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार चार राष्ट्रीयकृत कंपन्याकडून जा.नं.एसएसएस/वाहन/१४४६/२००८ दि.२४/०१/२००८ ने कोटेशन बोलाविण्यात आलेली आहेत. त्यानुसार खालील प्रमाणे बंद कोटेशन प्राप्त झालेली आहेत.

०१ दि.न्यु इंडिया ॲश्यूरन्स, कं. लि. श्रीरामपूर
०२ दि. ओरीएण्टल इंश्योरेंस कं. लि. कोपरगांव
०३ युनाइटेड इंडिया इन्शूरेन्स कं. लि. शिर्डी शाखा
०४ नेशनल इन्श्योरेन्स कं. लि.कोपरगांव

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

उपस्थित सर्व कोटेशन्ससादरकर्त्यांना सभेपूढे समक्ष बोलावून सुधारित अंतिम निम्नतम दर लेखी स्वरुपात बंद पाकीटात देणेबाबत सांगणेत आले.

त्यानुसार कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे सुधारित देऊ केले.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | कोटेशन्समधील दर रुपये | देऊ केलेले अंतिम दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | दि.न्यु इंडिया ॲश्यूरन्स, कं. लि.श्रीरामपूर | ५,६४,४२७.०० | ५,११,०००.०० |
| ०२ | दि. ओरीएण्टल इंश्योरेंस कं. लि.कोपरगांव | ६,२५,०००.०० | ६,१५,०००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | युनाइटेड इंडिया इन्शूरेन्स कं. लि.शिर्डी शाखा | ५,६५,३०९.०० | ५,५१,०००.०० |
| ०४ | नेशनल इन्श्योरेन्स कं. लि.कोपरागंव | ६,१६,१९९.०० | ५,८०,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन दि.न्यु इंडिया अॅश्यूरन्स, कं. लि.श्रीरामपूर.यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.०७** **कॅथलॅब विभागासाठी 3D Angiographic Image system & Injection system for Catheterization Laboratory खरेदीबाबत**

**निर्णय क्र.१७५** श्री साईबाबा रुग्णालयात दैनंदिन Angiography, Angioplasty करणेसाठी विविध प्रकारचे Contrast लागतात. सदर Contrast हे महागडी असतात. त्यांची अंदाजे किंमत रु.१,०००/- पासून १,६००/- पर्यंत असते. त्यामुळे सदर Contrast चा कमीत कमी वापर व्हावा व आर्थिक खर्च कमी व्हावा यासाठी डॉ. धर्माधिकारी व डॉ. बजाज, कार्डीओलॉजीस्ट यांनी उपरोक्त सिस्टीमची मागणी केलेली आहे.

उपरोक्त सिस्टीम खरेदी केल्यामुळे खालील प्रमाणे फायदे होतात:-

**A - 3D Angiographic Image System**

This system allows accurate Length, Diameter, Lesion area, & Bifurcation angle measurements which helps in appropriate interventional treatment strategy & selection of precious Medical Devices helping better clinical outcome of the procedure.

सदर सिस्टीमची अंदाजे किंमत रु.12,00,000/- इतकी आहे.

**B - Injection System for Catheterization Laboratory :-**

1. **SIGNIFICANT REDUCTION IN COST:-**
- Direct Savings:-
- • Saving of 30-40 % in contrast (dye) per procedure, which results approximately 40% reduction cost in your institute.
- Indirect Savings:-
- • Shorter procedure time.
- • High turnover of patients.
- • Shorter post procedural time.
- • Ease of Use – eliminates assembling various small connections / settings and hand injections

2. **CLINICAL SAFETY TO PATIENTS & OPERATOR:-**
- Safe in patient with Renal Compromise
- Less radiation to operator (short flurotime)
- Minimum Chance of Infection / sterile operations.

3. **UNPARALLEL FEATURE :-**
- Can be used for selective Coronary / Peripheral artery injections unlike regular injector systems, which are only for injecting left ventricle

4. **BETTER EFFICEINCY & PRODUCTIVITY:-**
- Better visualization
- Smaller lumen catheters
- Precise, Patient – tailored contrast injections.

सदर सिस्टीमची अंदाजे किंमत रु.१५,००,०००/- इतकी आहे.

उपरोक्त प्रमाणे दोन्ही (A+B) या सिस्टीमसाठी अंदाजे रु.२७,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त सिस्टीम विहीत पध्दतीने खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. २७,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.०८** **श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटरसाठी Anesthesia Ventilators खरेदीबाबत**

**निर्णय क्र.१७६** श्रीसाईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटरमध्ये दैनंदिन शस्त्रक्रिया करणेसाठी Anesthesia Ventilator ची आवश्यकता असल्या बाबतचे ऑपरेशन थिएटर विभागाने डि.पी. क्रमांक ७६०३ दि.०३/१२/२००७ अन्वये मागणी केलेली आहे. सदर व्हेन्टीलेटरसाठी अंदाजे रु.२,५०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदर व्हेन्टिलेटर चे Technical Specifications रुग्णालयाचे बायोमेडीकल इंजिनिअर व अॅनास्थेटिस्ट डॉ. यशोधन पितांबरे यांनी आपल्याकडे होणाऱ्या शस्त्रक्रियेनुसार तयार केलेले आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे :-

1) **MODES** : CMV- VARIABLE, I : E & ASSIST
2) **FLOW PATTERN** : LINEAR
3) **CMV – VAR. I: E Mode.**
- ◎ I:E Ratio : 3 :1, 2.5:1,2:1, 1.5:1, 1:1, 1:1.5, 1:2, 1:2.5, 1:3.
- ◎ BPM : 1 – 40 adjustable in Step of 1 BPM.\
- ◎ TIDAL VOLUME : 50-1500cc

◎ PEEP CONNECTED : Yes/ No.
◎ MINIUTE VOLUME : 30 LPM Max.

4) **ASSIST MODE**

◎ BPM: 1-40 adjustable in steps of 1 BPM.
◎ TIDAL VOLUME: 30-100cc adjustable in steps of 10cc.
100 -200cc adjustable in steps of 20cc.
200 -1500cc adjustable in steps of 50cc.
◎ INSPIRATION TIME: 0.07 to 3.5 sec.
0.07 to 0.10 in steps of 0.01 sec.
0.10 to 0.20 in steps of 0.02 sec.
0.20 to 3.5 in steps of 0.01 sec.
◎ PEEP CONNECTED: Yes/ No.
◎ TRIGGER SENSITIVITY : +19 to -9cm. in steps of 0.2 cm if PEEP is not connected
-1 to -9cm. in steps of 0.2 cm if PEEP is connected
◎ MINIUTE VOLUME: 30 LPM Max.

5) **PRESSURE RELEASE VALVE**: Range 10 to 50 cms. of $H_2O$.
6) **HIGH INSPIRATORY PRESSURE ALARM**: 0-50 cms. of $H_2O$.
7) **INDICATION (LED)** :

◎ POWER
◎ BPM (END OF INSPIRATORY CYCLE).
◎ TRIGGER.

8) **LCD DISPLAY**:

◎ MODE
◎ TIDAL VOLUME – (VOL)
◎ BREATHS PER MINUTE – (BPM)
◎ I:E RATIO – (I:E)
◎ INSPIRATION TIME – (Ti)
◎ TRIGGER SENSITIVITY – (Tg)
◎ ALARMS MESSAGES

9) **ALARMS** : UNIT MALFUNCTION (AUDIO & VISUAL)
TUBE DISCONNECTION (AUDIO & VISUAL)
EXCESSIVE INLET GAS FLOW (AUDIO & VISUAL)
INSUFFICIENT INLET GAS FLOW (AUDIO & VISUAL)
LOW MACHINE VOLUME (AUDIO & VISUAL)
APNEA (AUDIO & VISUAL)
HIGH INSPIRATORY PRESSURE (AUDIBLE)
POWER FAILURE (AUDIBLE)

10) **INLET PORT**: LOW – PRESSURE INLET FOR AIR, OXYGEN, ANAESTHETIC GAS.
11) **OUTLET PORT**: FOR CONNECTION TO PATIENT CIRCUIT.
12) **MAXIMUM PRESSURE OF INLET GAS**: LOW PRESSURE, AT ATMOSPHERIC LEVEL ONLY.

➢ Gas should not required for driving the ventilator. Gas to fed at inlet is only for patient's breathing requirements.

13) **BATTERY BACKUP**: MIN. 90 MINUTES.
14) **ACCESSORIES**:

a. Patient Circuit – for Adult & Pediatric.
b. NRV – ( Non - Rebreathing - Valve)
c. Test lung,
d. $O_2$ Sensor,
e. Flow Sensor.
f. Reservior Bag,
g. Mask (All Size)
h. All Standard Accessories.

तरी उपरोक्त Technical Specifications चे एक व्हेन्टिलेटर विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,५०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्रीसाईबाबा रुग्णालयाचे न्यूरो ऑपरेशन थिएटर साठी बॉईल्स ॲनेस्थेशिया मशिन व्हेटींलेटरसह खरेदीकामी निविदा प्राप्त झालेल्या असून,सदर निविदेंमध्ये तज्ञ समितीने शिफारस केलेले मशिन त्याच मंजूर दराने खरेदी करण्यात यावे,असें ठरलें.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.०९ संस्थान कर्मचारी जादा वैद्यकीय बीलाचा परताव्याबाबत**

**निर्णय क्र.१७७** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. पुंजाहरी लक्ष्मण नळे | श्री साईबाबा रुग्णालय | २२३८६.०० | २२३७६.०० |
| २ | श्री संजय सुकदेव वाणी | श्री साईबाबा रुग्णालय | ९२३८.०० | ९१८८.०० |
| ३ | श्री. बापूराव बबन धुमसे | श्री साईनाथ रुग्णालय | ४७६.०० | ४७६.०० |
| ४ | श्री.आण्णासाहेब गोवर्धन कुदळे | श्री साईबाबा रुग्णालय | २०४.०० | २०४.०० |
| ५ | श्रीमती वैशाली वसंतराव सूर्वे | श्री साईबाबा रुग्णालय | ८६०.०० | ८६०.०० |
| ६ | श्री. उमेश योगीराज रोकडे | श्री साईबाबा रुग्णालय | २९५०.०० | २८६४.०० |
| ७ | डॉ. अ. म. केसरकर | श्री साईनाथ रुग्णालय | ४९६.०० | ४९६.०० |
| ८ | श्री गुलामरसूल गुलामहबीब पठाण | श्री साईनाथ रुग्णालय | ७६४.०० | ७६४.०० |
| ९ | श्री. सुभाष नारायण चित्रे | श्री साईनाथ रुग्णालय<br>श्री साईबाबा रुग्णालय | ९६०.०० | ९६०.०० |
| १० | श्री. सुभाष भाऊसाहेब चौधरी | श्री साईबाबा रुग्णालय | १२५२.०० | १२५२.०० |
| ११ | श्री. मधुकर पंढरीनाथ बारसे | श्री साईनाथ रुग्णालय | २८११.०० | २४४६.०० |
| १२ | कु. कमल भिमराज तांबे | श्री साईबाबा रुग्णालय | ३६९७.०० | ३६९७.०० |
| १३ | श्री. संजय बबनराव गावडे | श्री साईबाबा रुग्णालय | ८२२.०० | ८२२.०० |
| १४ | कै. मिनाक्षी तुकाराम पाठक | श्री साईनाथ रुग्णालय | ३२५३.०० | ३२५०.०० |
| १५ | श्री. रमेश सिताराम बोधक | प्रवरा ग्रामीण रुग्णालय, लोणी | ४३०३.०० | ३४७३.०० |
| १६ | श्री. संजय बाबुराव कुलकर्णी | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल,पुणे | ४२१६.०० | ४२१६.०० |
| १७ | श्री. दिलीप पुडलिक गाढे | आनंदऋषी हॉस्पिटल, अहमदनगर | ३६८०.०० | ३२००.०० |
| १८ | श्री. प्रदिप दशरथ शिंदे | श्री साईबाबा रुग्णालय | ४०१.०० | ४०१.०० |
| १९ | श्री. किशोर साहेबराव गवळी | श्री साईबाबा रुग्णालय | ५९०.०० | ५४६.०० |
| २० | श्री. शैलेश महादेव जगताप | श्री साईबाबा रुग्णालय | १३१२.०० | १२९८.०० |
| २१ | डॉ. पुनम बाळासाहेब गवळी | श्री साईबाबा रुग्णालय | ११९३.०० | ११९३.०० |
| २२ | श्री. अजय विजय पंजाबी | श्री साईबाबा रुग्णालय | ५७३८.०० | ३६४२.०० |
| २३ | श्री. गुरुप्रसाद अरुण कापरे | श्री साईबाबा रुग्णालय | ३६५२.०० | ३६५२.०० |
| २४ | श्रीमती मनिषा आण्णासाहेब वल्टे | टाटा मेमोरीयल सेंटर, मुंबई | ३०८४४.०० | ३०८४४.०० |
| | | **एकुण -** | **१०६०९८.००** | **१०२११०.००** |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१०** **Holter Monitor खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.१७८** श्रीसाईबाबा रुग्णालयातील Cathlab विभागातील कार्डीयोलॉजिस्ट डॉ.बजाज यांनी डि.पी.क्र.३२७० दि.०५/११/२००७ अन्वये एक नग Holter Monitor ची मागणी केलेली आहे.

ज्या रुग्णांच्या छातीत धडधड होऊन हृदयाचे ठोके कमी - जास्त होतात, अशा रुग्णांचे ठोके सदरच्या मॉनीटर्सवर पहाणे शक्य होते. जेणे करुन शस्त्रक्रिया व तपासणीच्या वेळी रुग्णास मॉनिटर करणे सोपे होते.

सदरचा मॉनिटर आपणाकडे नसल्यामुळे सध्या रुग्णांची गैरसोय होत आहे. त्यामुळे रुग्णांना बाहेरच्या रुग्णालयात शिफारस करावी लागते. तेंव्हा सदरच्या रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून सदरच्या मॉनिटरची मागणी करण्यात आलेली आहे.

सदर मॉनिटर्स बरोबर लागणाऱ्या ॲक्सेसरीज (उदा. रेकॉर्डर, पी.सी., लेझर प्रिंटर व यु.पी.एस.) खरेदी कराव्या लागणार आहेत.

सदरचा मॉनिटर खरेदीकामी अंदाजे रु.११,२५,०००/- तसेच त्यासाठी लागणाऱ्या ॲक्सेसरीज खरेदी कामी अंदाजे रु.२,७६,२५०/- याप्रमाणे दोन्ही मिळून रु.१४,०१,२५०/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी वरीलप्रमाणे एक नग Holter Monitor विहीत पद्धतीने जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१४,०१,२५०/- च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.११** **श्री साईबाबा रुग्णालयातील आय.सी.सी.यु विभागाकरीता सेंट्रल मॉनिटरींग सिस्टम खरेदीबाबत**

**निर्णय क्र.१७९** श्रीसाईबाबा रुग्णालयातील आय.सी.सी.यु. विभागाने डि. पी. क्र. ६६११ दि. ०५/०१/२००८ अन्वये खालील प्रमाणे सेंट्रल मॉनीटरींग सिस्टिमची मागणी केलेली आहे. सध्या आय.सी.सी.यु. विभागात दहा बेड आहेत व दहाही ठिकाणी Philips कंपनीचे मॉनीटर प्रत्येक बेडजवळ बसविण्यात आलेले आहेत. यामुळे संबंधित विभागातील डॉक्टर्स व सिस्टर यांना प्रत्येक ठिकाणी जाऊन तेथील मॉनीटर दिसणाऱ्या परीस्थितीचे अवलोकन करावे लागते. त्याऐवजी सर्व मॉनीटरला एकत्रित जोडणारा एक CNS (Central Nursing Station) घेतल्यास एकाच ठिकाणी सर्व बेडवरील परिस्थितीचे अवलोकन करणे शक्य होईल. त्यासाठी आय.सी.सी.यु. विभागाने एका सेंट्रल मॉनीटरींग सिस्टिमची मागणी केलेली आहे.

| अ.नं. | तपशील | नग | प्रती नग अंदाजे किंमत रु. | एकुण खर्च अंदाजे रु. |
|---|---|---|---|---|
| १ | Central Nursing Station | १ | १२,००,०००.०० | १२,००,०००.०० |
| | | | **एकुण खर्च अंदाजे रु.** | **१२,००,०००.००** |

श्री साईबाबा रुग्णालयातील नवीन न्यूरो आय. सी. यू. शस्त्रक्रिया विभाग व नवीन आय. सी. यू. विभागासाठी लागणाऱ्या मशिनरी / उपकरणे खरेदीकामी उपरोक्त मॉनिटर्स, सेंट्रल नर्सिंग स्टेशन (CNS) डेफिब्रीलेटर व व्हेन्टिलेटर इत्यादीची मागणी केलेली आहे. त्यासाठी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०७/२००७ चे सभेतील मान्यतेनुसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदरचे खरेदी वेळी त्यातील मंजूर दरानुसार उपरोक्त प्रमाणे एक सेंट्रल मॉनीटरींग सिस्टिम आय.सी.सी.यु. विभागाकरीता खरेदी करता येईल.

तरी वरीलप्रमाणे सेंट्रल मॉनीटरींग सिस्टिम खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु. १२,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्रीसाईबाबा रुग्णालयात नविन आय.सी.यु.विभागाकरिता ८ व १६ मॉनिटरचे सेंट्रल नर्सिंग स्टेशन (CNS) खरेदीकामी निविदा प्राप्त झालेल्या असून,सदर निविदेमध्ये Philips कंपनीचे प्राप्त झालेल्या दरांमध्ये चर्चा/वाटाघाटी करुन मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांचे सल्ल्याने खरेदी करण्यात यावे,असें ठरलें. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१२** **श्री साईनाथ रुग्णालयाकरीता कार्यालयीन फर्निचर खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.१८०** श्रीसाईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड, कॅबीन व प्रशासकिय कार्यालय इत्यादी ठिकाणी रेकॉर्डस्, मशिनरी, इन्स्टुमेंट्स, सर्जीकल साहित्य इत्यादी ठेवणेकामी कपाटे व कार्यालयीन कामासाठी टेबलची आवश्यकता आहे. त्यानुसार साईनाथ रुग्णालयाने त्यांचे डि.पी. क्रमांक ८००१ दि.०७/०१/२००८ अन्वये कळविले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | तपशील | मागणी | अंदाजे किंमत | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | कपाट साईज : 1981mm x 914mm x 483mm | ७५ नग | ७०००.०० | ५२५०००.०० |
| २ | लोखंडी टेबल दोन्ही बाजूस ड्रावर असलेला सनमाईका टॉप साईज : 1370mm L x 675mm W x 750mm H | २५ नग | ६५००.०० | १६२५००.०० |
| | | | **एकुण -** | **६८७५००.००** |

उपरोक्तप्रमाणे कार्यालयीन फर्नीचर खरेदीकामी अंदाजे रु. ६८७५००.०० इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६८७५००.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रमाणे आवश्यक असणारे कार्यालयीन फर्निचर खरेदी करणेकामी गोदरेज कंपनीचे अधिकृत विक्रेत्यांकडून निविदा मागवुन खरेदी करण्यात यावे. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६,८७,५००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१३** **Light Weight Lead Gown खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.१८१** श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. विभागाने डि.पी.क्रमांक ४१२२ दि.२३/०७/२००७ अन्वये ५ नग व Cath Lab विभागाने डि.पी.क्रमांक ३२६७ दि.०२/११/२००७ अन्वये ६ नग असे एकूण ११ नग Light Weight Lead gown ची मागणी केलेली होती. सदरचे ११ नग Gown खरेदीकामीचा अंदाजे रु.३३,०००/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी दि. ०८/१२/२००७ चे मा. व्यवस्थापन समिती सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.

त्यानुसार इकडील पत्र क्र. २०१२८ दि. २२/१२/२००७ अन्वये एकुण १० पुरवठा धारकांकडून दि. ३१/१२/२००७ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ३ कोटेशन प्राप्त झालेले आहेत

१) मे. अनिता मेडीकल सिस्टिम प्रा. लि., मुंबई (बंद कोटेशन)
२) मे. तिरुपती एंटरप्रायजेस, पुणे (बंद कोटेशन)
३) मे. चोक्सी इमेजनींग लि., वसई - ठाणे (प्रशासन शाखेकडून टपालातून उघडून मिळाले)

वरीलप्रमाणे प्राप्त बंद कोटेशन आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| Sr.No. | Name of Party | Qty. | Make / Model | Rate Per in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Anita Medical System, Mumbai | **11** | Short | 8528.00 |
| | | | Large | 11024.00 |
| | | | Medium | 10192.00 |
| | | | Regular 100cm x 60 cm | 9360.00 |
| 2 | Tirupati Enterprises, Pune | | Techset (ISO 9001) 100cm x 60 cm | 7100.00 |
| 3 | Choksi Imagining Ltd, Vasai-Thane | | Radio Tech. | |
| | | | 95cm x 60 cm | 6079.00 |
| | | | 110cm x 60 cm | 7098.00 |
| | | | 120cm x 60 cm | 7604.00 |

यावर सविस्तर चर्चा होऊन निम्नत्तम दराने मे. तिरुपती एंटरप्रायजेस, पुणे यांचेकडून प्रती नग रु. ७,१००/- या दराने ११ नग Light Weight Lead gown खरेदी करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१४** **ब्लड बँकेमध्ये रक्तदात्यांचे (Blood Donar) रक्त घेण्यासाठी Donar Coach खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.१८२** श्रीसाईबाबा रुग्णालयातील ब्लड बँकेमध्ये Donar Coach २ नगांची मागणी केलेली आहे. सदरच्या Donar Coach मुळे रक्त दात्यास व्यवस्थित बसवून / झोपून रक्त देता येते. जेणेकरुन रक्त दात्यास / रक्त काढणारे तंत्रज्ञ / डॉक्टर्स यांना त्रास होत नाही. तसेच अन्न व औषध विभाग यांनी देखील ब्लड बँकेमध्ये Donar Coach ठेवण्याबाबत कळविलेले आहे. तेंव्हा ब्लड बँक विभागाने त्यांचे डि.पी.क्रमांक २६८७ दि.२४/०८/२००७ अन्वये दोन नगांची मागणी केलेली आहे. त्यानुसार ०२ नग Donar Coach कोटेशन मागवून खरेदी करणेकामीचा अंदाजे रु.२,००,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव दि.०८.१२.२००७ चे मा.व्यवस्थापन समिती सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समिती सभेचे मंजुरी अन्वये इकडील पत्र क्र.२०३३८ दि.२६.१२.२००७ अन्वये एकुण १६ पुरवठाधारकांकडून दि.०५.०१.२००८ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ४ कोटेशन प्राप्त झालेले आहेत

१) मे. विजय ट्रेडींग, श्रीरामपूर (प्रशासन शाखेकडून टपालातून उघडून मिळाले)
२) मे. एन.पी.एजन्सी, मुंबई (दोन कोटेशन-१ बंद कोटेशन व १ प्रशासन शाखेकडून टपालातून उघडून मिळाले)
३) मे. जनक हेल्थकेअर प्रा.लि., मुंबई (बंद कोटेशन)
४) मे. युनीव्हर्सल केमीकल्स, नाशिक (बंद कोटेशन)

वरीलपैकी अ.नं.१ चे कोटेशन प्रशासन शाखेकडून टपालातून उघडून मिळालेले असून त्यांनी कोटेशनमध्ये दर दिलेले नाहीत. अ.नं.२ मे. एन.पी.एजन्सी, मुंबई यांनी एक बंद कोटेशन पाठविलेले आहे, त्यावर कोटेशन असे नमुद केलेले आहे, तर दुसऱ्या कोटेशनच्या पाकीटावर कोटेशन असे नमुद केलेले नसल्यामुळे ते प्रशासन शाखेकडून टपालातून उघडून प्राप्त झालेले आहे. सदर उघडलेले कोटेशन देखील विचारात घ्यावे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, ब्लड बँकेमध्ये रक्तदात्यांचे (Blood Donar) रक्त घेण्यासाठी Donar Coach खरेदी करणेची आवश्यकता नसल्याने सदरहू विषय रद्द करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१५ डोळयावरील अयशस्वी शस्त्रक्रियेबाबत श्री छबुराव पर्वत राक्षे,चांदेकसारे ता.कोपरगांव यांचे तक्रार पत्राबाबत**

**निर्णय क्र.१८३** सौ.सुमन छबुराव राक्षे हिचे डाव्या डोळयावरील मोतीबिंदूची शस्त्रक्रिया डॉ.हेतल शाह यांनी दि.१८.०१.२००७ रोजी म्हणजेच एक वर्षापूर्वी (ओपीडी क्र.१२७८/०७) केलेली होती. या रुग्णाच्या डाव्या डोळयातील मोतीबिंदू अति पिकला असल्यामुळे (Hypermature) भिंगारोपण यशस्वी होऊ शकले नव्हते व या वस्तुस्थितीची कल्पना डॉ.शाह यांनी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना दिली होती.

दुस-या नेत्रतज्ञांच्या सल्ल्यानुसार (डॉ.अजित पाटील, नेत्र तज्ञ - श्री साईबाब हॉस्पिटल) या रुग्णाच्या डाव्या डोळयावर दुसरी शस्त्रक्रिया करणे गरजेचे असल्याचे रुग्ण व तिच्या पतीची खातरजमा झालेली आहे.

या शस्त्रक्रियेचा खर्च संस्थानमार्फत व्हावा, अशा प्रकारच्या धमकी वजा विनंतीची पत्रे रुग्णाचे पती श्री छबुराव राक्षे यांनी दि.२९.११.२००७, दि.०८.१२.२००७, दि.२५.१२.२००७ व दि.१६.०१.२००८ रोजी पाठविलेली आहेत. (सोबत सदर पत्रे अवलोकनार्थ सादर केली आहेत.)

रुग्ण गरीब असल्यामुळे मानवतावादी दृष्टीकोनातून या ऑपरेशनसाठी येणारा खर्च संस्थानमार्फत करण्यात यावा, अशा अर्थाच्या वैदयकीय संचालक यांचे सूचनेवर श्रीयुत छबुराव राक्षे यांनी त्यांचे दि.२५.१२.२००७ रोजीच्या तक्रार पत्रावर संमतीदर्शक स्वाक्षरी केलेली आहे.

वैदयकीय संचालक यांनी डॉ.सासवडे V.R.Surgeon, औरंगाबाद यांचेशी दूरध्वनीव्दारे याबाबत चर्चा केली असता याकामी रु.१५०००/- पर्यंत शस्त्रक्रियेचा खर्च व औषधोपचारासाठी इतर खर्च रु.२०००/- असा एकूण रु.१७,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित असल्याचे डॉ.सासवडे यांनी वैदयकीय संचालक यांना सांगितले आहे.

तरी सौ.सुमन छबुराव राक्षे यांची शस्त्रक्रिया डॉ.सासवडे V.R.Surgeon, औरंगाबाद यांचेकडून संस्थानमार्फत करुन देणेस व याकामी होणा-या एकूण रु.१७,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सौ.सुमन छबुराव राक्षे यांना शस्त्रक्रिया करणेसाठी डॉ.सासवडे V.R.Surgeon, औरंगाबाद यांचेकडे संस्थानमार्फत पाठविण्यात आले असल्याने सदरहू खर्चाची रक्कम रुपये १७,०००/- संस्थानमार्फत आदा करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१६ श्रीसाईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर करीता ड्रेसिंग ड्रम खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.१८४** श्रीसाईबाबा रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर विभागाने डि. पी. क्र. ७६३० दि.३१/०१/२००८ अन्वये खालील प्रमाणे ड्रेसींग ड्रमची मागणी केलेली आहे. ऑपरेशन थिएटर विभागातील जूने ड्रम खराब झाल्यामुळे त्यांनी नवीन लहाण (Size – 8” x 10”) व मोठा (Size – 12” x 15”) असे एकूण दोन ड्रेसींग ड्रमची मागणी केलेली आहे.

| अ.नं. | तपशील | नग | प्रती नग अंदाजे किंमत रुपये | एकूण खर्च अंदाजे रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | Dressing Drum S/S (Size – 8” x 10”) | 50 | 1500.00 | 75000.00 |
| 2 | Dressing Drum S/S (Size – 12” x 15”) | 50 | 2000.00 | 1,00,000.00 |
| | | | **एकूण खर्च अंदाजे रु.** | **1,75,000.00** |

सदरचे खरेदीकामी अंदाजे रु.१,७५,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सदरची खरेदी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१७ प्लॉस्टिक सर्जरी शिबीर आयोजित कसणेबाबत.**

**निर्णय क्र.१८५** मा.उपाध्यक्ष महोदय यांनी रोटरी क्लब कोपरगांव, यांना संस्थानच्या हॉस्पिटलमध्ये प्लॅस्टिक सर्जरी शिबीर घेणेस परवानगी दयावी, सदरचे शिबीर हे मोफत ठेवले असून, या शिबीरात नामांकित डॉक्टर्स उपस्थित राहणार असल्याने सदर शिबीराबाबत फेब्रुवारी महिन्यातील तीन दिवस निश्चित करुन त्याबाबत श्री.रणजीत गरुड, अध्यक्ष, रोटरी क्लब, कोपरगांव, विमल एजन्सीज, महावीर पथ, कोपरगांव या पत्यावर कळवावे, असे सुचविले आहे.

याबाबत दि. २४/०१/२००८ रोजी दु. ४.३० वा. मा. रणजीत गरुड, अध्यक्ष - रोटरी क्लब, कोपरगांव, माजी विश्वस्त डॉ. गर्जे, डॉ. नेने, श्री कोयटे व सहकारी तसेच मा. विश्वस्त श्री खांबेकर सो., मा.प्रशासकीय अधिकारी, मा. उप वैद्यकीय संचालक, वैद्यकीय प्रशासक,अधिक्षीका, श्रीसाईनाथ रुग्णालय, डॉ. नरोडे, कार्यालयीन अधिक्षक, मॅनेजर्स, सहा. अधिसेविका तथा श्री साईबाबा हॉस्पिटलचे पदाधिकारी यांची मा. वैद्यकीय संचालक यांचे कक्षात सदर शिबीराबाबत समक्ष चर्चा झाली आहे.

उपरोक्त चर्चेत प्लॅस्टिक सर्जरी शिबीर दि. २९ फेब्रु. ते ०२ मार्च या कालावधीमध्ये आयोजन करावे असे सुचविले आहे. तसेच दि. ३१/०१/२००८ रोजी सकाळी ११.०० वा. मा. वैद्यकीय संचालक यांनी माजी विश्वस्त डॉ. गर्जे (सदस्य - रोटरी क्लब, कोपरगांव,) यांचेशी दुरध्वनीद्वारे चर्चा केली असता सदर शिबीराकरिता रोटरी क्लबमार्फत तज्ञ डॉक्टर्स येणार आहेत तसेच प्रसिध्दी व रुग्णांची नाव नोंदणी - रोटरी क्लब, कोपरगांव, द्वारे करण्यात येणार असून नाव नोंदणी पूर्वी सदर रुग्णाची पूर्व तपासणीही क्लबमार्फतच करण्यात येणार आहे. तथापी शिबीराची उर्वरीत सर्व व्यवस्था श्री साईबाबा हॉस्पिटलमार्फत करावी लागणार आहे.

दि. २९ फेब्रु ते ०२ मार्चमध्ये प्लॅस्टिक सर्जरी शिबीर आयोजित करणे झाल्यास खालीलप्रमाणे व्यवस्था करावी लागणार आहे.

**१)** शिबीराकामी दोन शस्त्रक्रीया गृहे (नेत्र व अस्थिव्यंग शस्त्रक्रीया गृह) , त्यामध्ये अतिरीक्त दोन शस्त्रक्रीया टेबल, त्यासाठी लागणारे तात्पुरत्या स्वरुपात किमान ३ लॅम्प, न्युरो शस्त्रक्रीया गृहासमोरील हॉलमध्ये किमान २५ बेडची व्यवस्था व शस्त्रक्रीयेकरिता लागणारे सुचर व इतर साहित्य खरेदी मेडिकल स्टोअर्स विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे मार्फत करावी लागणार असून त्याकरिता अंदाजे रु. ७०,०००/- खर्च अपेक्षित आहे.

**२)** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये स्टाफची कमतरता असलेने, यापूर्वी श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये झालेल्या प्लॅस्टिक सर्जरी शिबीराचे अनुभव संपन्न मेडिकल व पॅरामेडिकल स्टाफ पुरविणेची व्यवस्था श्री साईनाथ रुग्णालयामार्फत करणेत यावी.

**३)** शिबीरकाळात शिबीरार्थी सामान्य शस्त्रक्रीयेच्या रुग्णांकरिता साधारणतः तीन दिवस व मोठ्या शस्त्रक्रीयेच्या रुग्णांकरिता आठ दिवस डिसचार्ज देणे शक्य नसल्याने आवश्यकता वाटल्यास सेमी प्रा. १ मध्ये किंवा इतरत्र व्यवस्था सहा. अधिसेविका,श्री साईबाबा हॉस्पिटल, यांचेमार्फत करण्यात यावी.

**४)** शिबीर काळात बाहेरून येणाऱ्या रूग्ण, त्यांचेसोबत आलेल्या प्रत्येकी एक नातेवाईकाची चहा - नाष्टा, भोजन व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कँटीन व प्रसादालय विभागामार्फत करणेकामी रूपये १०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

**५)** प्लॅस्टिक सर्जरी शिबीराच्या उद्‌घाटन समारंभाची व्यवस्था साईबाबा हॉस्पिटलमधील प्रशस्त हॉलमध्ये (श्रींचे मुर्तीसमोर) करता येईल.

**६)** या कालावधीत शिबीरार्थ्यांच्या सोबत आलेल्या नांतेवाईकांच्या विश्रांतीसाठी एक प्रशस्त हॉलची व्यवस्था धर्मशाळा विभागामार्फत करणेत यावी.

**७)** ध्वनिक्षेपण अथवा गरज पडल्यास दृक-श्रवण यंत्र योजनेबाबत व्यवस्था ध्वनीक्षेपण विभाग व ई.डी.पी मॅनेजर, श्री साईबाबा हॉस्पिटल, यांचेमार्फत करणेकामी रू ५०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

**८)** बाहेरून येणाऱ्या तज्ञ डॉक्टर्स व इतर महत्वाच्या व्यक्तींसाठी निवास व खानपान व्यवस्थेकामी चौकशी कार्यालय तथा जनसंपर्क अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल, यांचे मार्फत होणेकामी अंदाजे रु. १०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

**९)** शिबीर काळात डॉक्टर्स व मान्यवर व्यक्तींना नेणे-आणणेकामी एक सुमो किंवा तत्सम गाडीची व्यवस्था वाहन विभागामार्फत करण्यात यावी.

**१०)** १०० खुर्च्या,२५ नग कॉट्स, २५ गादया इ.चा पुरवठा नवीन भक्तनिवास (५०० रूम) यांचेकडून व्हावा, सदर व्यवस्था मेडिकल स्टोअर्स विभागाने करावयाची आहे.

**११)** पूजा, आदर-सत्कार व इतर व्यवस्था, मंदीर विभाग व वित्त व्यवस्थापक, श्री साईबाबा हॉस्पिटल, यांनी करणेकामी अंदाजे रू ५०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

**१२)** उपरोक्त कामी विविध विभागांना आवश्यकतेनुसार ज्यादा कंत्राटी कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देणेची जबाबदारी मा. कामगार अधिकारी व एच.आर. मॅनेजर, श्री साईबाबा हॉस्पिटल, यांचेकडे असावी.

**१३)** उपरोक्त शिवाय इतर महत्वाची कामे संस्थानचे इतर संबंधीत विभागांकडून करुन घेणेस तथा याकामी सदर विभागास येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता असावी. सदरची बीले मुदतीत संबंधीतांना अदा करणेची जबाबदारी वित्त व्यवस्थापक, श्री साईबाबा हॉस्पिटल, यांचे मार्फत होणेस मान्यता असावी ही विनंती.

तरी उपरोक्तप्रमाणे प्लॅस्टिक सर्जरी शिबीराचे रोटरी क्लब,कोपरगांव यांचे संयुक्त विद्यमाने आयोजन करणे व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये - एक लक्ष मात्रच्या) खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**दिनांक २४.०२.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाची कामापूरती नक्कल-**

**विषय नं.१८ श्री क्षेत्र पुणतांबा या तिर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**निर्णय क्र. १८६ (अ)** श्रीक्षेत्र पुणतांबा येथे श्री चांगदेव महाराजांची समाधी असून, श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणारे बहुतांशी भक्त श्रीक्षेत्र पुणतांबा येथे श्री चांगदेव महाराजांचे पुरातन समाधीचे दर्शनार्थ भेट देत असतात. या भाविकांमध्ये दक्षिण भारतातील भक्तांची संख्या प्रामुख्याने मोठी आहे. शिर्डी-पुणतांबा हे दोन ही तीर्थक्षेत्र एकमेकांना पक्क्या रस्त्याने जोडलेले आहेत. मात्र हा रस्ता अरुंद असल्याने गर्दीच्या वेळेस वाहतुकीची कोंडी होऊन वाहतूक ठप्प होते तसेच कोपरगांव-श्रीरामपूर या रेल्वेमार्गाने रेल्वे येण्या-जाण्याच्या वेळेस दोन्ही बाजूने गाडयांची मोठी रांग लागून भाविकांचा बराचसा वेळ वाया जातो.

या अनुषंगाने शिर्डी-पुणतांबा रस्त्याचे रुंदीकरणासह डांबरीकरण, सी.डी.वर्कचे काम,कोपरगांव-श्रीरामपूर रेल्वेमार्गावर उड्डाण पुल उभारणे ही कामे होणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी ग्रुप ग्रामपंचायत पुणतांबा-रस्तापूर यांनी दिनांक १२ ऑक्टोबर, २००६ रोजीचे पत्रान्वये उपरोक्त कामांसाठी संस्थानमार्फत निधी उपलब्ध व्हावा, अशी विनंती केली होती.

सदरहू प्रस्तावावर, मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४ ऑक्टोबर, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८०७ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे :

"यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी - पुणतांबा ही दोन तीर्थक्षेत्रे जोडणाऱ्या अंदाजे १८ किमी रस्त्याचे रुंदीकरण करुन मजबुतीकरण व डांबरीकरण करणेस तसेच पुणतांबा येथे कोपरगांव-श्रीरामपुर रस्त्यावरील रेल्वे क्रॉसिंगजवळ उड्डाणपुल उभारणेकामी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणेस तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था अधिनियम २००४ मधील कलम नं २१(२)मधील तरतुदी नुसार महाराष्ट्र शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले. "

**(ब)** सरपंच, ग्रामपंचायत पुणतांबा यांनी दिनांक २७ जून, २००७ रोजीचे पत्रान्वये, श्री क्षेत्र पुणतांबा तिर्थक्षेत्राचे विकासासाठी श्री साईबाबा संस्थान मार्फत निधी उपलब्ध करुन दिल्यास भाविकांसाठी वाहनतळ, गांवाला जोडणाऱ्या रस्त्यांचा विकास, अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण, धार्मिक वस्तु संग्रहालय, धर्मशाळा, बहुउद्देशीय सभागृह, बागबगीचा, रेल्वे उड्डाणपुल, भाविकांना स्नानासाठी घाट, स्नानगृह, सांडपाणी व्यवस्था इत्यादी सुविधा उपलब्ध करुन गैरसोय दुर करता येऊ शकेल. त्यासाठी निधी मंजुर करावा त्यानंतर विकास आराखडा तयार करता येईल, अशी विनंती केली होती.

सदरहू प्रस्तावावर, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ जुलै, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५८९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे :

"तरी पुणतांबा तिर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान मार्फत निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी विनंती केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. याकामी संबंधितांकडून सविस्तर प्रस्ताव आर्थिक खर्चासह मागविण्यात यावा व व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा असे ठरले. "

**(क)** मा.व्यवस्थापन समितीच्या **परिच्छेद अ** मधील निर्णयानुसार, या कामांचे बांधकाम आराखडयासह अंदाजित खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन देणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांना पत्र देण्यात आलेले होते. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, लोणी यांनी त्यांचेकडील दिनांक २० ऑक्टोबर, २००७ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम आराखडयासह अंदाजित खर्चाचे अंदाजपत्रके इकडील कार्यालयास पाठविलेली आहेत. त्यांचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे :

**(०१) शिर्डी - पिंपळवाडी - पुणतांबा रस्ता (प्रजिमा ९) १/०० किमी ते १३/५०० किमी सुधारणा करणे :**

**रस्त्याविषयी सर्वसाधारण माहिती :**

शिर्डी-पिंपळवाडी-पुणतांबा हा रस्ता रस्ते विकास योजना सन १९९१-२००१ अन्वये प्र.जि.मा. ९ या दर्जाचा असून रस्त्याचा पृष्ठभाग डांबरी असून धावपट्टीची रुंदी ५.५० मीटर आहे. सदरील रस्ता काळया मातीतून जातो.

या रस्त्याची सा.क्र. ००/०० ते ०१/०० ही लांबी शिर्डी नगरपंचायतकडे वर्ग करण्यात आलेली असून, सा.क्र. ०१/०० ते ०५/२०० या लांबीत जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांचे मार्फत सुधारणाचे काम प्रगतीत आहे.

हा रस्ता शिर्डी तसेच पुणतांबा या दोन तीर्थक्षेत्रास जोडणारा महत्वाचा व जवळचा रस्ता आहे.

**बांधकाम अंदाजपत्रकात करण्यात आलेल्या तरतूदी :**

०१. अस्तित्वातील भरावाचे १२ मीटर रुंदीला रुंदीकरण करणे.

०२. धावपट्टीचे रुंदीकरण ५.५ मीटर वरुन ७.०० मीटर रुंदीला करणे ( कठिण मुरुमाचे अस्तरीकरण, जि.एस.बी., ६० मीमी खडीचा एक थर, ४० मीमी खडीचा एक थर).

०३. ७५ मीमी जाडीचे बीबीएम करणे ( सा.क्र.५/२०० ते १३/५०० मध्ये ७.०० मी. रुंदीला व सा.क्र. १/०० ते ५/२०० मध्ये फक्त रुंदीकरणासाठी).

०४. २० मीमी जाडीचे कारपेट सीलकोटसह (७.०० मी. रुंदीला).

०५. अस्तित्वातील पाईप मोऱ्या व पुलांचे रुंदीकरण १२.०० मीटर रुंदीला करणे.

०६. इतर अनुषंगिक बाबींचे बांधकाम करणे.

सा. बां. प्रा. वि. नाशिक, सन २००७-२००८ च्या दरसुचीप्रमाणे रस्त्याची सुधारणा करण्यासाठी येणारे अंदाजित खर्च रुपये ४,८८,००,३३०/- (अक्षरी रुपये चार कोटी अठ्ठयाऐंशी लाख तीनशे तीस मात्र) दर्शविण्यांत आलेला आहे.

**(०२) राज्यमार्ग क्रमांक १० ते देवळाली-श्रीरामपूर-पुणतांबा-कोपरगांव रस्त्यावर (प्रजिमा ७) पुणतांबा येथे रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम करणे :**

**<u>पुलाविषयी सर्वसाधारण माहिती :</u>**

रा.मा.१० ते देवळाली-श्रीरामपूर-पुणतांबा-कोपरगांव हा रस्ता रस्ते विकास योजना सन १९९१-२००१ प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक ७ या दर्जाचा असून हा रस्ता राहुरी, श्रीरामपुर, राहाता व कोपरगांव या चार तालुक्यांना जोडणारा महत्वाचा रस्ता आहे. पुणतांबा येथे सध्या रेल्वे उड्डाणपुल नसल्यामुळे बऱ्याच वेळा दळणवळण खंडीत होते. हा रस्ता शिर्डी साठी बाह्यवळण रस्ता म्हणुन उपयोग होत आहे. सध्या नगर-मनमाड रस्त्यावर मोठया प्रमाणात दळणवळण असल्याकारणाने ब-याच वेळा अपघात तसेच दळणवळण बंद पडते. त्यामुळे या उड्डाण पुलाचे बांधकाम झाल्यास वाहतुक सुरळीत होऊन नगर-मनमाड रस्त्यावरील वाहतुक वर्दळ कमी होण्यास मदत होईल.

तसेच पुणतांबा पासून पुरणगांव कडे जाणारा हा रस्ता सुध्दा अतिशय महत्वाचा असून या रस्त्यामुळे भविष्यात अहमदनगर व औरंगाबाद जिल्हा जोडला जाणार आहे.त्यामुळे या रेल्वे उड्डाण पुलावरुन पुरणगांवकडे जाण्यासाठी एक जोड रस्त्याचे काम करणे गरजेचे आहे.

**<u>बांधकाम अंदाजपत्रकात करण्यात आलेल्या तरतुदी :</u>**

उपरोक्तप्रमाणे पुणतांबा येथे उड्डाण पुलाचे जोडरस्त्यासह बांधकाम करणे.

सदर ढोबळ अंदाजपत्रकातील दर हे महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ यांचेकडे चौकशी करुन नमूद करण्यात आलेले आहेत. या कामाची अंदाजपत्रकीय किंमत रुपये १७,४१,५०,०००/- मात्र (अक्षरी रुपये सतरा कोटी एकेचाळीस लाख पन्नास हजार) दर्शविण्यांत आलेली आहे.

**(ड)** मा. व्यवस्थापन समितीच्या **<u>परिच्छेद ब</u>** मधील निर्णयानुसार, सार्वजनिक बांधकाम विभाग, लोणी यांनी त्यांचेकडील दिनांक २३ ऑक्टोबर, २००७ रोजीच्या पत्रान्वये श्री चांगदेव महाराज समाधी मंदिर परिसरात भक्तनिवास इमारत अंदाजित खर्चाचे अंदाजपत्रक इकडील कार्यालयास पाठविलेले आहे. त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे :

**(०१) श्री चांगदेव महाराज मंदिर, पुणतांबा येथे भक्तनिवासाचे बांधकाम करणे :**

**<u>भक्तनिवासविषयी सर्वसाधारण माहिती :</u>**

पुणतांबा, तालुका राहाता येथे गोदावरी नदीच्या तीरी श्री चांगदेव महाराज यांची समाधी असून येथे मोठया प्रमाणावर भाविक येतात, या भाविकांना राहण्यासाठी या तीर्थक्षेत्री भक्तनिवास होणे अतिशय गरजेचे आहे.

**<u>बांधकाम अंदाजपत्रकात करण्यात आलेल्या तरतुदी :</u>**

पुणतांबा येथे ५२७.२८ चौरस मीटर जोता क्षेत्रफळाचे फक्त तळमजला असलेल्या एक भक्तनिवास इमारतीचे बांधकाम करणे.

अंदाजपत्रकासोबत जोडलेल्या नकाशामध्ये, १६ खोल्या, ०८ शौचालय, ०८ प्रसाधनगृह व नियोजित पहिल्या मजल्यावर जाणेकामी जिने दर्शविलेले आहेत. तसेच अंदाजपत्रकात विद्युतीकरण, पाणीपुरवठा व सांडपाणी व्यवस्था आदि सुविधांचा समावेश करण्यात आलेला आहे.

सन २००७-२००८ च्या दरसुचीप्रमाणे भक्तनिवासचे बांधकाम करण्यासाठी अंदाजित खर्च रुपये ६३,०३,२३८/- (अक्षरी रुपये त्रेसष्ट लाख तीन हजार दोनशे अडोतीस मात्र) दर्शविण्यांत आलेला आहे.

**(इ)** उपरोक्त **परिच्छेद क व परिच्छेद ड** मध्ये नमूद केल्याप्रमाणे तीन विकास कामांसाठी खालीलप्रमाणे अंदाजित खर्च सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविलेला आहे :

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित खर्च रुपये |
|---|---|---|
| ०१ | शिर्डी-पिंपळवाडी-पुणतांबा रस्त्याची सुधारणा करणे. | ०४,८८,००,३३०/- |
| ०२ | पुणतांबा येथे रेल्वे उड्डाणपुल बांधणे. | १७,४१,५०,०००/- |
| ०३ | पुणतांबा येथे फक्त तळमजला असलेल्या भक्तनिवास इमारतीचे बांधकाम करणे | ००,६३,०३,२३८/- |
| | **एकूण रुपये** | **२२,९२,५३,५६८/-** |

मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २००६ रोजीच्या निर्णयानुसार, उपरोक्त तक्त्यात दर्शविल्यानुसार, अ.नं. ०१ व ०२ मध्ये दर्शविलेल्या रस्ता व उड्डाणपुलाच्या विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाची मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक २८ जुलै, २००७ रोजीच्या निर्णयानुसार, उपरोक्त तक्त्यातील अ.नं. ०३ मध्ये दर्शविलेल्या भक्तनिवास इमारतीच्या बांधकाम विकास कामासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर करणेत येत आहे. या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीची तत्वतः मान्यता मिळालेस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करता येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त तक्त्यातील अ.नं. ०२ पुणतांबा येथे रेल्वे उड्डाणपुल बांधणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला. उर्वरित अ.नं.०१ शिर्डी-पिंपळवाडी-पुणतांबा रस्त्याची सुधारणा करणेकामी रुपये ०४,८८,००,३३०/- व अ.नं.०३ पुणतांबा येथे फक्त तळमजला असलेल्या संस्थान मालकीचे भक्तनिवास इमारतीचे बांधकाम करणेकामी रुपये ६३,०३,२३८/- असे दोन प्रस्तावांसाठी संस्थान मार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. मात्र भक्तनिवास इमारतीची मालकी संस्थानची राहील अशी अट घालण्यात यावी,असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१९** **महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास शिर्डी येथे जमीन उपलब्ध करुन देणेबाबत**

**निर्णय क्र.१८७** **(अ)**मा.सहव्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांनी शिर्डी येथे विनाशुल्क जागा/जमीन उपलब्ध करुन देणेबाबत सादर केलेला विनंती-वजा-प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १० जानेवारी, २००८ रोजीचे सभेत विचारार्थ सादर करणेत आला होता. सदरहू प्रस्तावार या सभेत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे :

यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील संस्थान मालकीच्या जमीनी या भूसंपादनाचे माध्यमातून मिळालेल्या आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास जमीन उपलब्ध करुन देणेस हरकत नाही. तत्पूर्वी मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीमध्ये संस्थानचे विविध विकास प्रकल्प नियोजित आहेत. त्यासाठी संस्थानने जागाही निश्चित केलेल्या आहेत. त्या जागा वगळून उर्वरित जागा/जमिनी महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळाच्या अधिकाऱ्यांना दाखविण्यात याव्यात. त्यांनी अशी जागा/जमीन निश्चित केल्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे माहितीसाठी व निर्णयार्थ पुनःश्च प्रस्ताव सादर करावा. तद्नंतर अधिनियमातील तरतूदीनुसार महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळास जागा/ जमीन देणेबाबतचा प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी सादर करावा, असे ठरले.

**(ब)** उपरोक्त विषयांस अनुसरुन, मा.ना.श्री. विजयसिंह मोहिते पाटील, ग्रामविकास व पर्यटन मंत्री, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक १६ जानेवारी, २००८ रोजी मुंबई येथे त्यांचे मंत्रालयातील कक्षात बैठक आयोजित केलेली होती. सदरहू बैठकीस, मा.ना.श्री.मोहिते पाटील यांचेसह, मा.अध्यक्ष श्री.ससाणेसो., मा.विश्वस्त श्रीमती उर्मिला जाधव, श्री. यावलकर, सहव्यवस्थापकीय संचालक, मपविम, श्री.सुर्यवंशी, प्रांताधिकारी, श्रीरामपूर, श्री. माने, तहसिलदार, राहाता व श्री. आहेर, वरिष्ठ मुख्य अभियंता हे उपस्थित होते.

सदरहू बैठकीत मा.मंत्री महोदय यांना मा.व्यवस्थापन समितीचा दिनांक १० जानेवारी, २००८ रोजीचा उपरोक्त परिच्छेद अ मध्ये नमूद केलेला निर्णय अवगत करण्यात आला. त्या निर्णयांस अनुसरुन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारात भक्तांच्या सेवा-सुविधेसाठी जागा/जमीन उपलब्ध करुन देणेबाबत सविस्तर चर्चा करण्यात येऊन खाली नमूद केल्याप्रमाणे निर्णय घेणेत आले :

०१. मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील संस्थान मालकीचे गट नंबर २४९ (क्षेत्र ०१ हेक्टर ७९ आर) व गट नंबर २५० (क्षेत्र ०१ हेक्टर ८५ आर) या सलग असलेल्या जमिनी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या संयुक्त सहकार्याने, सम प्रमाणांत विकसित करण्यात याव्यात.

०२. मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील संस्थान मालकीचे गट नंबर १७२ (क्षेत्र ०७ हेक्टर ९६ आर) या जमिनीमध्ये अंदाजित ०३ हेक्टर ७९ आर जमिनीमध्ये साई आश्रम प्रकल्प भाग २ चा निवासस्थान प्रकल्प कार्यान्वीत करण्यांत येत आहे. या प्रकल्पाचे काम ही सुरु झालेले आहे. या जमिनीचे उर्वरित क्षेत्रापैकी ०२ हेक्टर जमीन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास विकसित करणेसाठी देण्यात यावी.

०३. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास जमीन उपलब्ध करुन देणेबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीस अनुसरुन शासनाचे विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत कार्यवाही करावी.

**(क)** महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने त्यांचे सुरुवातीचे विनंती प्रस्तावात सदरहू जमिनी विनाशुल्क उपलब्ध करुन मिळाव्यात, असे नमूद केलेले आहे. तथापि, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम, २००४ चे कलम १७ (३) मध्ये खालील प्रमाणे नमूद केलेले आहे : विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रामित करण्यात येणार नाही.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १० जानेवारी, २००७ रोजीचे सभेत झालेल्या निर्णयानुसार, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना विनाशुल्क जमीन उपलब्ध करुन देणेबाबत तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने दिनांक १६ जानेवारी, २००८ रोजी निश्चित केलेल्या मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील गट नंबर २४९ (क्षेत्र ०१ हेक्टर ७९ आर) व गट नंबर २५० (क्षेत्र ०१ हेक्टर ८५ आर) मधील जागा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या संयुक्त सहकार्याने समप्रमाणांत विकसित करणेस आणि गट नंबर १७२ मधील ०२ हेक्टर जमीन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास विकसित करणेस देणेकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२०** **संस्थानचे मौजे शिर्डी येथील नव्याने घेतलेल्या स.नं.५४,५५ जागेवर वाहन पार्किंग करणेकरीता तारकुंपन करणेबाबत.**

**निर्णय क्र.१८८** श्रीसाईबाबा संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.५४,५५ (पुनर्वसन व क्रिडांगण) या आरक्षीत असलेल्या जमिनी प्रसादालय परिसराचे उत्तर बाजूस असलेली लक्ष्मीनगर वसाहत स्थलांतरीत करणेसाठी खरेदी केलेली आहे. तथापी सदरहू प्रकल्पास विलंब लागणार असल्याने तुर्त याठिकाणी भक्तांचे वाहन पार्किंग करण्याचे नियोजन आहे. भक्तांचे वाहन पार्किंग करणेसाठी संस्थानतर्फे प्रसादालय परिसर, नविन भक्तनिवासस्थान परिसर व धर्मशाळा परिसर येथे पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच दोन तीन ठिकाणी खाजगी पार्किंग आहेत. पंरतू सदरची पार्किंग व्यवस्था अपुरी पडत असल्याने बऱ्याच वेळेस साईभक्त त्यांचे वाहन नगर- मनमाड रोड, पिंपळवाडी रोडवर पार्किंग करतात, त्यामुळे वहातुकीला अडचण होते. याकरीता संस्थानने नव्याने खरेदी केलेल्या स.नं. ५४,५५ पार्कींग व्यवस्था करणेकामी मुरुम टाकणे इरेगेशन चारीमध्ये नळया आर.सी.सी टाकणे याकामी येणारे अंदाजे रुपये ७५,०००.०० मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि. २८/०७/२००७ चे सभेत नि.क्र.५९६ (१४) अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार तेथे आर.सी.सी.पाईप टाकून घेणेत आले आहे. सदर क्षेत्रावर अतिक्रमण होऊ नये तसेच आजुबाजुने रहिवासी सदर ठिकाणी टॉयलेट करु नये याकरीता तारकंपाउंड करणे गरजेचे आहे.

तसेच सदर क्षेत्रास सुरक्षिततेच्या दृष्टीने काटेरी तारेचे कुंपन करणेची आवश्कता असुन याकामी अंदाजे रुपये २,४९,१८८.०० मात्र खर्च अपेक्षीत असुन त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळेस, सुरक्षिततेच्या दृष्टीने संस्थान मालकीच्या संपूर्ण मोकळया जमिनींना सिमेंट पोलचे तारकंपांऊड करणेकामी प्रस्ताव तयार करुन व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करावा,असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२१** **संस्थान रुग्णालयासाठी सांडपाणी प्रक्रिया संयत्र (STP) उभारणीकामी आलेल्या निविदांबाबत**

**निर्णय क्र.१८९** श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता सांडपाणी प्रक्रिया संयत्र उभारणेकामी व त्यासाठी येणारे योग्य त्या खर्चास दि. १९/०८/२००६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ५५४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाकरीता संस्थानमार्फत प्रकल्प सल्लागार म्हणून मे. एनस्ट्रक्ट कन्सलटींग इंजिनिअर्स, पुणे यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदरहू सांडपाणी प्रक्रीया संयत्र (STP) उभारणीकामी सिलबंद निविदा मागविण्यात आल्या असता खालील ठेकेदारांनी निविदा भरलेल्या होत्या.

१. मेलहेम इंजिनियर्स प्रा.लि.पुणे
२. जी.एस. वॉटर ट्रिटमेंट टेक्नोलॉजीस प्रा.लि., मुंबई
३. डेक्कन एनवायरोमेंटल कन्सलटंटस् , पुणे

उपरोक्त निविदा दि. १०-०१-२००८ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे उघडण्यात आल्या. सदरहू सभेत या निविदांची तांत्रिक सल्लागार यांचेमार्फत छाननी करण्यात येऊन त्यांचे अभिप्रायासह प्रस्ताव पुढील सभेपुढे सादर करणेत यावे, असे ठरले आहे. त्यानुसार उघडण्यात आलेल्या निविदा छाननीकरीता संस्थानने नेमलेले कन्सलटंट मे. एनस्ट्रक्ट कन्सलटींग इंजिनिअर्स, पुणे यांचेकडे दि. १८/०१/२००८ रोजीचे पत्रान्वये पाठविण्यात आले. मे. एनस्ट्रक्ट कन्सलटींग इंजिनियर्स, यांनी सदर निविदांची व त्यासोबतचे कागदपत्रांची छाननी करुन दि. २५/०१/२००८ रोजी चे पत्रान्वये अहवाल सादर केलेला आहे. त्यामध्ये तांत्रिक सल्लागार यांनी नमूद केले आहे की, सर्व देकारांचे अभ्यासाअंती मे. डेक्कन एनव्हायरोमेंटल कन्सल्टंटस, पुणे यांची निविदा योग्य व निम्नतम असून त्यांनी दोन्ही STP संयंत्रांसाठी (१५० घनमिटर/ दिवस व २०० घनमिटर / दिवस) सादर केलेली निविदा स्विकृतीबाबत विचार करणेस हरकत नाही. मे. डेक्कन एनव्हायरोमेंटल कन्सल्टंटस् यांचे निविदेनुसार श्री साईबाबा हॉस्पिटल येथिल दोन्ही सेप्टीक टँकचे सांडपाणी एकत्र करणे, पाणी व विज कनेक्शन देणे, STP संयंत्राचे आऊटलेट ड्रेनेजला जोडणे ही कामे संस्थानतर्फे करावी लागणार असून त्यासाठी अतिरिक्त खर्च येईल.

उपरोक्त निविदांचे छाननीसाठी सल्लागार यांनी वाणिज्यिक देकाराबरोबरच खालील मुद्यांचाही विचार केलेला आहे.

१. देखभाल व दुरुस्तीमधिल सुलभता
२. कंपनीचा दर्जा व शिर्डीपासूनचे अंतर
३. पुर्वानुभव व या अगोदर सेवा दिलेल्या ग्राहकांचे समाधान
४. वार्षिक देखभाल कंत्राटामधिल पुर्वानुभव
५. वार्षिक देखभाल सेवा पुरविण्याची क्षमता

उपरोक्त निविदांचा तांत्रिक सल्लागार यांनी सादर केलेला तुलनात्मक तक्ता आजचे सभेपुढे सादर करण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| **अ.नं.** | **निविदासादरकर्त्याचे नाव** | **श्रीसाईबाबा हॉस्पिटल** | | **श्रीसाईनाथ रुग्णालय** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **निविदेतील दर रुपये** | **वाटाघाटीअंती देऊ केले दर रुपये** | **निविदेतील दर रुपये** | **वाटाघाटीअंती देऊ केले दर रुपये** |
| ०१ | मेलहेम इंजिनियर्स प्रा.लि.पुणे | ५३,५७,४१५.०० | अनुपस्थित | ५०,९२,१५५.०० | अनुपस्थित |
| ०२ | जी.एस. वॉटर ट्रिटमेंट टेक्नोलॉजीस प्रा.लि., मुंबई | ३३,४९,९२०.०० | २५,५०,०००.०० | २६,३२,०८०.०० | २०,१७,०००.०० |
| ०३ | डेक्कन एनवायरोमेंटल कन्सलटंटस् , पुणे | १८,९०,०००.०० | १७,९५,५००.०० | १६,८३,०००.०० | १५,९८,८५०.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे. डेक्कन एनवायरोमेंटल कन्सलटंटस् , पुणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. तसेच श्रीसाईबाबा हॉस्पिटल येथील दोन्ही सेप्टीक टँकचे पाणी एकत्र करणे-नियोजित STP साठी पाणी व विज कनेक्शन देणे STP सयंत्राचे आऊटलेट ड्रेनेजला जोडणे या व इतर अनुषंगिक येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२२** **सर्व्हे नंबर १२४ पैकी मधील मध्यवर्ती भांडार इमारतीचे परिसरात पेव्हींग ब्लॉक्स बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.१९०** सन २००५-२००६ मध्ये संस्थानने प्रसादालयासाठी मोठया प्रमाणावर आवश्यक असणारे गहू, तांदूळ, डाळी इत्यादी साहित्याची साठवणूक करणेसाठी संस्थान मालकीच्या स.नं. १२४ पैकी मधील जागेत मध्यवर्ती भांडाराची इमारत बांधलेली आहे.

सदरहू इमारतीचे बाजुने कॉंक्रीटचे Plinth Protection करण्यात आलेले असून, इमारतीचे चार ही बाजूने डांबरी रस्ता तयार करण्यात आलेला आहे. यामधील मोकळया जागेत माती असल्याने तेथे घुशी, उंदीर इत्यादीपासून त्रास होऊ नये व तसेच इमारतीभोवतीचा परिसर स्वच्छ असावा या करीता या मोकळया जागेमध्ये कॉंक्रीट पेव्हींग ब्लॉक्स बसविण्यात यावेत, असे मा.विश्वस्त डॉ. एकनाथ भा. गोंदकर, मा.विश्वस्त श्री.पांडुरंग ग. अभंग व मा.कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे दिनांक ०२ फेब्रुवारी, २००८ रोजीच्या समक्ष परिसर पहाणीचे वेळी सुचना केलेली आहे.

सदरहू परिसरात सिमेंटचे पेव्हींग ब्लॉक्स बसविणेकामी खालीलप्रमाणे अंदाजित खर्च अपेक्षित आहे :

| Sr.No. | Description | Qty. | Rate / Unit | Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Excavation | 077.40 cum | 058/- per cum | 4,489=20 |
| 02 | Hard Murum Filling | 089.78 cum | 130/- per cum | 11,671=40 |
| 03 | Pavements (Paving Blocks) | 527.00 sqm | 520/- per sqm | 2,74,040=00 |
| | Sub Total | | | 2,90,200=40 |
| | 5 % Contingencies | | | 14,510=10 |
| | Total | | | 3,04,710=40 |

मध्यवर्ती भांडार इमारतीचे परिसरात पेव्हींग ब्लॉक्स बसविणेकामी अंदाजित रक्कम रुपये ३,०४,७१०/- मात्र इतका खर्च असुन त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,मध्यवर्ती भांडार इमारतीचे परिसरात पेव्हींग ब्लॉक्स बसविणेकामी विहित पद्धतीने कोटेशन मागवुन काम करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,०४,७१०/- मात्र चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२३** **श्री साईलीला गुजराथी भाषेतून प्रकाशित करणेबाबत.**

**निर्णय क्र.१९१** श्री.जयसिंह ब निंबाळकर, बडोदे हे जुने साईभक्त असून, गुजराथी भाषेत भक्तांकरीता श्री साईलीला मासिकाची गुजराथी आवृत्ती साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी द्वारा प्रसिद्ध करण्यात यावी अशी इच्छा प्रकट केले नुसार, मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८.०९.२००५ रोजीचे सभेतील विषय नं.३५ निर्णय क्र.५११ नुसार गुजराथी साईलीला आवृत्ती प्रसिद्ध करणेबाबत मान्यता मिळालेली आहे. संस्थानद्वारा सध्या श्री साईलीला द्वैमासिक नियतकालीकाच्या मराठी व हिन्दी-इंग्रजी अंक छपाई केली जाते. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे छपाई संख्या नग | प्रति अंक छपाई दर सर्व करांसहीत शिर्डी पोहोचसह रुपये पैसे | अंकात ४ पानाने घट किंवा वाढ झाल्यास प्रती अंक छपाई दर रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी ३२ + ४ =३६ पाने | १५,००० | ११.६८ | १.३७ |
| ०२ | साईलीला अंक हिंदी-इंग्रजी ३२ +४ =३६ पाने | २५,००० | ११.६८ | १.३७ |
| ०३ | दसरा विशेषांक मराठी ६४ +४ = ६८ पाने | १५,००० | २०.०३ | १.३७ |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी ६४ +४ =६८ पाने | २५,००० | २०.०३ | १.३७ |

वरील प्रमाणे धर्तिवर गुजराथी भाषेतून साईलिला अंकांची प्रसिद्धी खालील तपशिलाप्रमाणे करता येईल.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे छपाई संख्या | प्रति अंक छपाई दर सर्व करांसहीत शिर्डी पोहोचसह अंदाजे रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक गुजराथी ३२ + ४ पाने =३६ पाने | नोंदणीनुसार | १५.६८ |

वरीलप्रमाणे साईलीला द्वैमासिक अंकाची छपाई स्वरुप अवलोकनार्थ सादर केले आहे. तदनुसार खालील तपशिलाप्रमाणे गुजराथी साईलीला अंकांची छपाई करुन घेता येईल.

१) श्री जयसिंह ब. निंबाळकर हे गुजराथी भाषिक तज्ज्ञ असून, त्यांचे मार्गदर्शनाखाली गुजराथी साईलीला अंकांची छपाई करुन घेता येईल. त्यांचेवर कार्यकारी संपादक ( गुजराथी साईलीला) मासिक जबाबदारी टाकता येईल. याकामी त्यांना मानधन व शिर्डी येथे राहण्याची व जेवणाची मोफत सोय उपलब्ध करुन देता येईल.तसेच श्री.निंबाळकर यांना बडोदा ते शिर्डी येण्या-जाण्याचा प्रवास भाडे खर्चही द्यावा लागेल.

२) श्री जयसिंह ब. निंबाळकर यांनी श्री साईलीला मासिक दोन महिन्यात आवृत्ती प्रसिद्ध करण्याऐवजी दर महिन्याला मासिक आवृत्ती प्रसिद्ध करणेबाबत मत प्रकट केले आहे. तेव्हा त्यातच सर्व उत्सव, विशेषांक प्रसिद्ध करता येतील.

३) श्री जयसिंह ब. निंबाळकर यांनी श्री साईलीला मासिकाची वार्षिक वर्गणी रु.१५०/-, पाच वर्षाकरीता रु.७००/- व १० वर्षाकरीता रु.१४००/- मात्र ठेवता यावी असे मत प्रकट केले आहे.

४) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८.०९.२००५ रोजीचे सभेतील विषय नं.३५ निर्णय क्र.५११ अन्वये श्री साईलीला अंक गुजराथी छपाई कामाचे मानधनाबाबत खालील तपशिलाप्रमाणे मान्यता मिळालेली आहे.

| **तपशिल** | **पद** | **प्रति महा.मानधन** | **एकूण वार्षिक रक्कम** |
|---|---|---|---|
| **संपादक** | **१** | **७,०००/-** | **८४,०००/-** |

तसेच उपासंपादक गुजराथी प्रति महा वेतन रु.५५००-१७५-९०००/- व काम्प्युटर ऑपरेटर प्रति महा वेतन रु.३०५०-७५-३९५०-८०-४५९०/- व कार्यालयीन शिपाई प्रति महा रु.२६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४०००/- या वेतन श्रेणीत कर्मचारी नेमणूक करणेबाबत ठरले आहे.

अ) श्री जयसिंह ब. निंबाळकर यांचे कार्यकारी संपादक म्हणून मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संपादकीय काम करणा-या व्यक्तिस दरमहा रु.७,०००/- मानधन देता येईल, तसेच त्यांना जाणे-येण्याचा प्रवास भाडे खर्च शिर्डीस मोफत निवास व भोजन व्यवस्था करणेस मान्यता मिळावी.

ब) सदर द्वैमासिकासाठी उपसंपादक या पदाऐवजी सहाय्यक लिपीक म्हणून तात्पुरत्या स्वरुपात श्री निंबाळकर यांनी शिफारस केलेले श्री. अनिल भोजानी यांना सुरुवातीस प्रती महा रु.३५००/- एकत्रित मानधनावर सहा महिन्यांसाठी नेमणूक करावी असे वाटते, नंतर अंकाचा खप, त्यास साईभक्तांचा

मिळणारा प्रतिसाद व कामाचे स्वरुप आदी बाबी विचारात घेऊन त्यांचे एकत्रित मानधन रु.५०००/- करणेबाबत विचार करता येईल.

१) सदर अंकाच्या छपाईकामी मुद्रकशोधकची व्यवस्था बडोदा येथे श्री. निंबाळकर यांनी करावी व बाजारभावाप्रमाणे त्यास प्रती पानास (पाठपोट) रु.१०/- या दराने आकार देण्यात यावा.

२) मराठी भाषेतील मसुद्याचा/माहितीचा गुजराथी भाषेत भाषांतर करणेकामी बडोदा येथील एका भाषांतरकाराची नियुक्ती करण्याचे श्री. निंबाळकर यांनी सुचित केले आहे. तसेच त्यास प्रती पानास रु.२०/- (पाठपोट) याप्रमाणे आकार देणेबाबतही श्री. निंबाळकर यांनी सुचित केले आहे.

३) सदर मासिकाचे छपाईकामी आवश्यक असणारी संगणकीय अक्षर जुळवणीचे काम हे सध्या मराठी साईलीलाचे छपाईचे काम मे. परफेक्ट प्रिंट प्रा., मुंबई या मुद्रणालयात करण्यात येते. गुजराथी साईलीलाचे संगणकीय अक्षर जुळवणीचे कामही याच मुद्रणालयातून करुन घेता येईल.

४) मात्र सदरची सर्व कार्यवाही करणेकामी प्रथमत: गुजराथी मासिक प्रकाशित करणेकामी आवश्यक असणारा नोंदणी क्रमांक घेणेबाबतची कार्यवाही तात्काळ करावी लागणार आहे.

क) उपरोक्त सर्व मुद्दे विचारात घेता गुजराथी साईलीला आवृत्ती प्रकाशित करणेसाठी तत्संबंधीत डी.टी.पी व छपाई खर्च टपालासह खालील दर्शविल्या तपशिलाप्रमाणे तयार करणेकामी खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशिल | येणारा अपेक्षित खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक गुजराथी पाने ३२ छपाई | ११.६८ | |
| ०२ | टपाल खर्च प्रती अंक | २.०० | |
| ०३ | मुद्रक शोधन ३२ पानासाठी (पाठपोट) | ३२०.०० | प्रती पान (पाठपोट) रु.१०/- |
| ०४ | भाषांतर खर्च३२ पानासाठी (पाठपोट) | ६४०.०० | प्रती पान (पाठपोट) रु.२०/- |
| ०५ | संगणकीय अक्षर जुळवणी (डी.टी.पी) ३२ पानासाठी (पाठपोट) | २,५६०.०० | प्रती पान (पाठपोट) रु.८०/- अंदाजे |
| | एकूण खर्च रुपये | ३,५३३.६८ | |

तरी उपरोक्त तक्त्याचे अवलोकन करता एक गुजराथी भाषेतील साईलीला मासिक तयार करणेकामी पुर्णांकित रुपये ३,५३४/- मात्र एवढा खर्च अपेक्षित आहे. तसेच सदर साईलीला मासिकाचे संपादनाचे काम शिर्डी येथूनच करण्यात येईल. सदर गुजराथी भाषेतील साईलीला मासिकाचे स्वरुप खालील प्रमाणे ठेवणे आवश्यक आहे.

०१) "श्री साईलीला" गुजराथी मासिकांचे सर्व साधारण अंक अतिल रंगीत ३२ पाने + मुखपृष्ठाची ४ पाने चार रंगात रंगीत लॅमिनेशन केलेली अशी एकूण ३६ पाने पोटात तार मारुन बांधणी करावयाची आहे.

०२) "श्री साईलीला" गुजराथी मासिकाचे सर्व साधारण अंक छपाई साईज ८.००" x १०.५०" अशी असेल.

०३) मुखपृष्ठ छपाईसाठी १७० जी.एस.एम. लाइकेम आर्ट पेपर वापरावयाचा आहे.

०४) अंकातील रंगीत पृष्ठे संगणकीय अक्षर जुळवणी करुन सी.डी. वर देण्यात येतील. आतील रंगीत छपाईसाठी वापरावयाचा कागद ७० जी.एस.एम. LWC, UPM, ULTRA Paper (LWC-Light Weight Coted paper) वापरावयाचा आहे. याप्रमाणे संपूर्ण छपाईसाठी नमुद केलेले कागद वापरुन नियतकालिक अंकांची छपाई करणे बंधनकारक आहे

उपरोक्तप्रमाणे "अ" नुसार श्री.जयसिंह ब.निंबाळकर यांची गुजराथी साईलीला करीता कार्यकारी संपादक म्हणून प्रतीमहा रु.७,०००/- मानधनावर नियुक्ती करणेस तसेच त्यांना बडोदा ते शिर्डी जाणे-येण्याचा प्रवास भाडे खर्च, शिर्डीस मोफत निवास व भोजन व्यवस्था करणेस व "ब" नुसार श्री.अनिल भोजानी यांना सुरुवातीस प्रती महा रु.३५००/- एकत्रित मानधनावर सहा महिन्यांसाठी नेमणूक करणेस तसेच "क" नुसार गुजराथी साईलीला आवृत्ती प्रकाशित करणेसाठी तत्संबंधीत डी.टी.पी व छपाई खर्च टपालासह पुर्णांकित रुपये ३,५३४/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेस त्याचप्रमाणे गुजराथी साईलीला मासिकाची वार्षिक वर्गणी रु.१५०/- ,पाच वर्षाकरीता रु.७००/- व दहा वर्षाकरीता रु.१४००/- मात्र ठेवणेस तसेच परदेशी साईभक्तांकरिता पाच वर्षासाठी रुपये ६७००/- म्हणजेच १७० डॉलर्स व दहा वर्षाकरिता रुपये ७४००/- म्हणजेच १८० डॉलर्स ठेवणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**विषय नं.२४** **पुस्तके छपाई कामाचे कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत**

**निर्णय क्र.१९२** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित पुस्तके/फोटो छपाई करणेबाबत मा व्यवस्थापन समितीचे दि.२९,३१.०३.२००४ चे सभेतील विषय नं.२६ निर्णय क्रं १३८ नुसार १८ निवडक प्रेसधारक व मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५.११.२००५ चे सभेतील विषय नं.२९ निर्णय क्र.६७८ नुसार १२

प्रेसधारक असे एकूण ३० खालील प्रेसधारकांकडून छपाईची कामे करुन घेणेबाबत निर्णय झालेला आहे.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.युनायटेड मल्टीकलर प्रिंटर्स,पुणे |
| ०२ | मे.अमल ऑफसेट प्रा.प्रा.लि.दादर, मुंबई |
| ०३ | मे.रविक आर्टस् ॲन्ड प्रिंटर्स प्रा.लि.वडाळा, मुंबई |
| ०४ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. |
| ०५ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर |
| ०६ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ०७ | मे.सुमंगल आरटेक, मुंबई |
| ०८ | मे मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) प्रा.लि.मुंबई. |
| ०९ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे |
| १० | मे.प्रिंटोग्राफी फोर्ट, मुंबई |
| ११ | मे.प्रिंटमन, मुंबई |
| १२ | मे.विकास इले.(सकाळ पेपर्स) सातपूर, नाशिक |
| १३ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे |
| १४ | मे.प्रिंट पॅक बिजनेस फॉमर्स प्रा.लि. लातुर |
| १५ | मे.माणिकचंद नंदादिप पेपर प्रॉ.प्रा.लि., पुणे |
| १६ | मे.चिराग प्रिंटर्स, मुंबई |
| १७ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर |
| १८ | मे न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई |
| १९ | मे सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई |
| २० | मे नेक्टर प्रिंटर्स प्रायव्हेट लि., मुंबई |
| २१ | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे |
| २२ | मे ओनस प्रिंट सोलुशन (इंडिया) प्रा.लि., मुंबई |
| २३ | मे निर्मल ऑफसेट प्रा.लि., नाशिक |
| २४ | मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |
| २५ | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई |
| २६ | मे उचित ग्राफिक्स प्रिंटर्स प्रा.लि., मुंबई |
| २७ | मे एस.व्ही. प्रिंटर्स मुंबई |
| २८ | मे.प्रेमियर प्रेस,सिंकदराबाद |
| २९ | साई सिक्युरिटी प्रिंटर्स लि., बंगलोर |
| ३० | श्रीरंग प्रकाशने प्रा.लि., नाशिक |

**(अ)** संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो छपाईकामी निम्नतम दरधारकाकडून छपाईचे काम करुन घेण्यात येते. त्यांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात येत नाही.

संस्थान निर्मित ऑडिओ कॅसेट/सी.डी. व व्हीसीडी तसेच डीव्हीडी तयार करणेकामी यापूर्वी मुंबई येथील नामांकित सी.डी. निर्मात्यांकडून कोटेशन्स मागविण्यात येतात. प्राप्त झालेली कोटेशन्स मा. व्यवस्थापन समितीचे सभेत समक्ष उघडण्यात येतात, त्यानाही वाटाघाटीसाठी बोलविण्यात येत नाही. कोटेशनमधील निम्नतम दराचे निर्मात्यास निर्मितीचा आदेश देण्यात येतो.

**(ब)** पुस्तके छपाईकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ चे सभेतील निर्णयाप्रमाणे जा.नं. एसएसएस/वशी/प्रकाशने/१६२८/२००८ दि.२८.०१.२००८ अन्वये खालील प्रमाणे पुस्तकांचे छपाई कामाचे ३० निवडक प्रेसधारकांना छपाई कामाचे कोटेशन्स पाठविण्यात आलेली आहेत. सदरची कोटेशन भरुन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.२५.०२.२००८ अखेर देण्यात आलेली आहे.

| अ.नं | पुस्तकाचे नांव | मागिल छपाईची तारीख | मागिल छपाई संख्या | मागिल छपाई दर | नवीन छपाई संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सत् चरित्र (ओवी टू ओवी ) तेलगू | १८.१.०७ | ५,००० | ६१.६० | ५,००० |
| ०२ | साईसत्चरित्र -हिंदी | २२.१.०७ | १,००,००० | २१.७० | २,००,००० |
| ०३ | साईसत्चरित्र- तेलगू | २२.१.०७ | १,५०,००० | २६.०० | २,५०,००० |
| ०४ | साईसत्चरित्र-तामिळ | ३.१०.०७ | २०,००० | ३१.८४ | ३०,००० |
| ०५ | श्री साई चरित्र-बंगाली | १.११.०४ | ५००० | २७.०० | ५००० |
| ०६ | चिल्ड्रेन्स साईबाबा( वि.मेहता) इंग्रजी | ३.२.०७ | ५००० | ४७.०० | ५००० |
| ०७ | साईलिलामृत- हिंन्दी | ६.२.०२ | १०,००० | ११.७५ | १०,००० |
| ०८ | साईलिलामृत -गुजराथी | ९.४.०१ | ५,००० | १२.७५ | ५,००० |
| ०९ | बच्चों के साईबाबा- हिन्दी | ७.६.०४ | १०,००० | ३.४७ | ५,००० |
| १० | मुलांचे साईबाबा - कन्नड | १०.६.१९९७ | १०,००० | ३.०० | ५,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | मुलांचे साईबाबा - तामिळ | १४.१.०३ | ३,००० | ५.०० | ५,००० |
| १२ | श्री सद्‌गुरु साईनाथ सगुणो मराठी आरतीचा हिन्दी अनुवाद | ४.६.०६ | २०,००० | ६.०० | १०,००० |
| १३ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती - तामिळ | ४.११.०४ | ५००० | ८.०० | ५,००० |
| १४ | श्री साईनाथ सगुणो.आरती (झरिन) इंग्रजी | १९.१.०५ | ५००० | १०.२० | ५,००० |
| १५ | रुद्राध्याय (११ वा अध्याय) -मराठी | ३.२.०७ | १०००० | १.८४ | १०,००० |
| १६ | श्री साईनाथ स्तवनमंजिरी-दासगणू - इंग्रजी | १९.१.०५ | ५,००० | १.८५ | ५,००० |
| १७ | श्री साईनाथ स्तवनमंजिरी - गुजराथी | २८.६.०४ | १०,००० | १.८० | ५,००० |

उपरोक्त पुस्तके छपाईकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ चे सभेतपुस्तके छपाई कामीचे एकूण रु. १,४९,४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

वरील पुस्तके छपाईकामी ३० निवडक प्रेसधारकांपैकी दि.२५.०२.२००८ अखेर " **ब** " मध्ये नमुद केलेप्रमाणे पुस्तके छपाई कामीचे मुदतीत प्राप्त होणारी कोटेशन्स् मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष उघडणेस व निम्नतम दराचे प्रेसधारकांना छपाई कामाचे आदेश देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**विषय नं.२५** **झरिनव्दारा रुपांतरीत इंग्रजी श्री साईसतचरित छपाईकामी जादा रकमेच्या खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१९३** डायरेक्टर साईप्रेस प्रा.लि., नवीदिल्ली यांचेमार्फत झरिनद्वारा श्री साईसत्‌चरित्र मराठी ग्रंथाचा ओवी टु ओवी इंग्रजी अनुवादीत श्री साई साईसमर्थ सत्‌चरित हे पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ चे सभेतील विषय नं. ७५ निर्णय क्र.७५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. याबाबत सदर पुस्तकाचे प्रथम प्रकाशन असल्याने ५,००० प्रतिंची छपाई करुन घेणेस प्रती नग अंदाजे छपाई दर रु.१३०/- प्रमाणे अंदाजे रु.६,५०,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात येऊन सदरचे पुस्तकाचे प्रथम आवृत्तीचे छपाईचे काम दिल्ली येथील साईप्रेस इंडिया प्रा.लि., नवीदिल्ली यांचे देखरेखीखाली करुन घेणेबाबत ठरले आहे. उपरोक्त पुस्तक छपाई कामी त्यांचे दि.१७.०२.२००८ चे कोटेशनमधील प्रती नग रु.१३४.५० पैसे प्रमाणे नमुद केलेला दर मान्य करण्यात येऊन त्यांना उपरोक्त पुस्तकाचा छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. तथापी उपरोक्त पुस्तक छपाई कामाचा छपाई अंदाजे दर रु.१३०/-प्रमाणे धरण्यात आला होता, परंतु प्रत्यक्ष कोटेशन मध्ये रु.१३४.५० पैसे आलेला आहे. त्यामुळे छपाई खर्च प्रती नगामागे रु.४.५० पैसे प्रमाणे ५००० प्रतींसाठी एकूण रुपये २२,५००/- मात्र जादा खर्च होत असल्याने, सदरचा जादा होणा-या रुपये २२,५००/- (अक्षरी रुपये बावीस हजार पाचशे) मात्रच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**विषय नं.२६** **सन २००८-२००९ साईभक्तांच्या निवासासाठी असलेली निवासस्थाने व रुग्णालयाकरीता पेस्ट कंट्रोलधारकाची नियुक्ती करणेबाबत**

**निर्णय क्र. १९४** शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांचे निवासासाठी ज्या इमारती आहेत, त्या इमारतीमध्ये,तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे इमारतींमध्ये भक्तांना / रुग्णांना ढेकूण, झुरळ इत्यादी किटकांचा त्रास होवू नये म्हणून इमारतींमध्ये किटकनाशक फवारणी करण्यात येते. निविदा/दरपत्रके मागणी करुन किटकनाशक फवारणीचे काम मे.एम.वॉल्श,मुंबई या कंपनीस दि.०१/०४/२००६ ते दि.३१/०३/२००७ अखेर एक वर्षे कालावधीसाठी इमारतींचे आकारमानानुसार देण्यात आले होते. वर्षभराचे कालावधीत त्यांनी दिलेली विनातक्रार व समाधानकारक सेवा विचारात घेऊन दि.३१/०३/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.२८३ नुसार " आहे त्याच अटी-शर्तीवर व दरावर "त्यांना दि.०१/०४/२००७ ते दि.३१/०३/२००८ अखेर एक वर्षाचे कालावधीसाठी किटकनाशके (पेस्ट कंटोल) फवारणीकामी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

आता,दि.३१/०३/२००८ अखेर मे.एम.वॉल्श यांचा किटकनाशक फवारणीचा कालावधी संपुष्टात येत असून,दि.०१/०४/२००८ पासुन पुढील एक वर्ष कालावधीसाठी किटकनाशके फवारणी करण्यासाठी कंत्राटदाराची नेमणूक करणे आवश्यक आहे.

किटकनाशके फवारणीच्या सर्वसाधारण अटी-शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

(१) किटकनाशके फवारणीसाठी लागणारी औषधे,साहित्य,कामगार,त्यांचा रहाणेचा खर्च,चहापाणी, नाष्टा,जेवण,पगार इ.सर्व खर्च कंत्राटदाराने स्वतः करावयाचा आहे.

(२) फवारणी करावयाचे निश्चित केलेल्या इमारतींसाठी त्यांचे एकूण आकारमानानुसार वार्षिक मंजुर रक्कम रु.१०,०८,१०५/- या रक्कमेवर ५% प्रमाणे रु.५०,४०५/- एवढी कंत्राटदाराची रक्कम संस्थानकडे सुरक्षा अनामत रक्कम म्हणून बिनव्याजी जमा राहील.

(३) प्रति दोन महिन्यांस एक फवारणी,याप्रमाणे वर्षभरात सर्व इमारतींमध्ये एकूण ६ फवारण्या करावयाच्या असून प्रत्येक फवारणी पुर्ण झालेनंतर एकूण मंजूर रक्कमेच्या १०% एवढे बिल कंत्राटदारास आदा करण्यात येईल व उर्वरीत बिलाची रक्कम वर्षअखेरीस कंत्राटदारास आदा करण्यात येईल.

(४) एकदा किटकनाशके फवारणी केल्यानंतरही किटकांचा नाश न झाल्यास तक्रार निवारण होईपर्यंत पुनश्च कंत्राटदाराने त्याचे स्वखर्चाने पुन्हा किटकनाशके फवारणी करुन देण्याची, व इमारतीमध्ये संपुर्ण वार्षिक कालावधीमध्ये ढेकूण,झुरळे इत्यादी किटकांचा उपद्रव होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

उपरोक्त सर्व कारणांसाठी व त्या अनुषंगीक बाबींकरीता रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर कंत्राटदाराने करारनामा करुन देणे आवश्यक राहील. किटकनाशके फवारणी करण्यासाठी खालील विभागांकडे / इमारतींमध्ये खोल्या व हॉल असून,त्याचे क्षेत्रफळ खालीलप्रमाणे आहे. त्याकरीता सन २००७-२००८ मधील फवारणीकरीता रक्कम मंजुर करण्यात आलेली आहे.

| अ. नं. | विभाग. | इमारतीचे नांव | खोल्या संख्या. | हॉल संख्या. | खोल्या व हॉल मिळुन एकूण क्षेत्रफळ. (चौ.फुटामध्ये) | किटकनाशके फवारणीसाठी मंजूर केलेली वार्षिक रक्कम. |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | ०२. | ०३. | ०४. | ०५. | ०६. | ०७. |
| (१) | साईबाबा भक्तनिवासस्थान. | साईबाबा भक्तनिवासस्थान इमारत. | ५०९. | १५. | १,७३,२६८. | ४,५१,९५८.०० |
| (२) | चौकशी व निवासस्थान विभाग. | (अ) साईप्रसाद नं.१. | ८१. | -- | २४,५७०. | ६४,०८८.०० |
| | | (ब) साईप्रसाद नं.२. | ७८. | -- | २०,२५७. | ५२,८३८.०० |
| | | (क) समर्पण. | ०२. | -- | ४९०. | १,२७८.०० |
| | | (ड) साईनाथछाया. | ०१. | -- | १३४८. | ३,५१६.०० |
| | | (इ) साईनिवास अतिथीगृह. | २४. | ०२. | १४,२२५. | ३७,१०५.०० |
| | | (ई) साईउद्यान (लॉकर्ससह) | ३६. | १२. | २४,२७५. | ६३,३१९.०० |
| | | (फ) शांतिनिकेतन. | १४. | -- | २,५६९. | ६,७०१.०० |
| (३) | धर्मशाळा विभाग. | धर्मशाळा इमारत नं.१. | ४४. | ०२. | १६,६२१. | ४३,३५४.०० |
| (४) | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी. | धर्मशाळा इमारत नं.२. | ४४. | ०६. | २१,४५९. | ५५,९७४.०० |
| (५) | श्री साईबाबा रुग्णालय,शिर्डी. | श्री साईबाबा रुग्णालय इमारत. | १४९. | ३०. | ८७,४००. | २,२७,९७४.०० |
| | | एकुण.... | ९८२. | ६७. | ३,८६,४८२. | १०,०८,१०५.०० |

भक्तांचे निवासासाठी असलेल्या वर नमूद केलेल्या इमारती तसेच दोन्ही रुग्णालयांच्या इमारती मिळून एकूण ३,८६,४८२ चौरसफुट आकारमानासाठी दि.०१/०४/२००७ ते दि.३१/०३/२००८ या एक वर्ष कालावधीसाठी एकूण रु.१०,०८,१०५/- एवढा खर्च मंजूर / निश्चित केलेला आहे.

दि.०१/०४/२००८ पासून पुढील एक वर्षासाठी किटकनाशके फवारणी करण्याकरीता ठेकेदारी निश्चित करण्यासाठी इमारती व आकारमानात बदल झालेला नाही. गतवर्षाप्रमाणे त्याच इमारती व तेवढेच एकूण ३,८६,४८२ चौरसफुट आकारमान आहे.

मे.एम.वॉल्श हे वार्षिक कराराने किटकनाशक फवारणीचे काम करीत आहेत. त्यांचे काम समानधानकारक असून,त्यांचे किटकनाशके फवारणी कामाची परिणामकारकता प्रभावी आहे.

तरी दि.०१/०४/२००८ पासून पुढील एक वर्ष कालावधीसाठी किटकनाशके (पेस्ट कंट्रोल) फवारणीसाठी मे.एम.वॉल्श,मुंबई यांना सध्या आहे त्याच अटी शर्तीवर मुदतवाढ द्यावयाची किंवा किटकनाशके (पेस्ट कंट्रोल) फवारणी करणेसाठी नवीन ठेकेदार नियुक्ती करणेकरीता निविदा / दरपत्रके मागणी करण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा / दरपत्रके मागणी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन सन २००८-०९ मध्ये साईभक्तांचे निवासस्थाने व रुग्णालयांकरिता सध्या पेस्ट कंट्रोलचे काम करीत असलेले ठेकेदार मे.एम.वॉल्श,मुंबई हे सध्या आहे त्याच अटी शर्तीवर काम करण्यात तयार असल्यास त्यांचेकडून दिनांक १.४.२००८ पासून एक वर्ष कालावधीसाठी पेस्ट कंट्रोलचे काम करुन घेण्यात यावे. तसेच वाढीव इमारतीसाठी मान्य दराने काम करुन घेण्यात यावे, त्यांनी दरवाढ मागितल्यास याकामी नव्याने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात,असें ठरलें.

(कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवासस्थान)

**विषय नं.२७** **श्रीरामनवमी उत्सव २००८ उत्सवाचे मुख्य दिवशी समाधी मंदिर व मंदिर परिसरात हेलीकॅप्टरने पुष्पवृष्टी करणेस परवानगी मिळणेबाबत ओ.एस.एस.अेव्हीअेशन प्रा.लि.भोपाळ यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.१९५** सालाबादप्रमाणे श्रीरामनवमी उत्सव श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या वतीने साजरा करण्यात येतो. चालू वर्षी शनिवार दि.१२.०४.२००८ ते सोमवार दि.१४.०४.२००८ अखेर तीन दिवस उत्सव साजरा करण्यात येणार आहे.

ओ.एस.एस.अेव्हीअेशन प्रा.लि., भोपाळ यांनी दि.२२ जानेवारी २००८ चे विनंती पत्रान्वये श्रीरामनवमी उत्सव कालावधीत उत्सवाचे मुख्य दिवशी रविवार दि.१३.०४.२००८ रोजी हेलिकॉप्टर मधून श्रींचे समाधी मंदिर व सभेवतालच्या परीसरात पुष्पवृष्टी करणेसाठी परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

सन २००७ मध्ये व्यवस्थापन मंडळाचे दि.१७.०२.२००७ रोजीचे सभेत विषय नं.५२ निर्णय क्र.१६४ अन्वये अशा प्रकारची परवानगी देण्यात आली होती. सन २००७ मधील उत्सवकाळात उत्सवाचे मुख्यदिवशी दि.२७.०३.२००७ रोजी मध्यान्ह आरतीनंतर पुष्पवृष्टी करण्यात आली होती.

तरी यंदाचे वर्षी शनिवार दि.१२.०४.२००८ ते सोमवार दि.१४.०४.२००८ अखेर तीन दिवस श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे मुख्य दिवशी रविवार दि.१३.०४.२००८ रोजी पुष्पवृष्टी करणेची परवानगी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली, मात्र संरक्षणाकरीता शिर्डी पोलिस स्टेशन मार्फत यावर नियंत्रण ठेवण्यात यावे, असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर विभाग/संरक्षण अधिकारी)

**विषय न.२८** **श्री साईबाबांचे मंदिरातील आरत्यांच्या वेळा बदलणेबाबत**

**निर्णय क्र.१९६** दिवसेदिवस भक्तांची गर्दी प्रचंड प्रमाणात वाढत आहे. विशेषतः सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशी साईभक्तांचे गर्दीचा उच्चांक होत आहे. साईभक्त शिरडी येथे साईबाबांचे दर्शन घेण्याकरीता येत असल्याने अधिकाधिक भक्तांना दर्शन मिळावे याकरिता सध्या असलेल्या चार आरत्यांच्या वेळामध्ये बदल करणे आवश्यक आहे. आरतीच्या वेळेतील संभाव्य बदलाच्या वेळा खालीलप्रमाणे असाव्यात असे वाटते.

| अ.नं. | आरतीची प्रचलित वेळ | | संभाव्य आरतीतील बदलाची वेळ | |
|---|---|---|---|---|
| ०१ | काकड आरती | पहाटे ०५.१५ वा. | काकड आरती | पहाटे ०४.३० वा. |
| ०२ | मध्यान्ह आरती | दुपारी १२.०० वा. | मध्यान्ह आरती | दुपारी १२.०० वा. |
| ०३ | धुपारती | सुर्यास्ताच्या वेळी | धुपारती | सुर्यास्ताच्या वेळी |
| ०४ | शेजारती | रात्रौ १०.०० वा. | शेजारती | रात्रौ १०.३० वा. |

वरील प्रमाणे आरतीच्या वेळेत बदल झाल्यास मंदिराची वेळ १ तास १५ मिनिटांनी वाढेल तसेच दुपारच्या आतीमध्ये अर्ध्या तासाची वेळ वाढविल्यास जास्त भक्त दर्शन करुन जातील,असा प्रस्ताव मा.कार्याकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी येणारे भक्तांची नोंद होणेकामी काऊंटींग मशिन खरेदी करण्यात यावे,असेही ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर विभाग)

**विषय नं.२९** **भक्त अभिषेक पुजा बॅचेस वाढविणे बाबत.**

**निर्णय क्र.१९७** दि.१३.११.२००७ पासून सत्यनारायण हॉलचे वरील सभामंडपात सकाळी ०९ ते १० या वेळेत अभिषेकपुजा सुरु करण्यात आली आहे. या पुजेच्या वेळी श्री साईबाबांची पंचधातूची मूर्ती ठेऊन षोडोपचार पुजा करण्यात येते.

परंतू या अभिषेक पुजेचा जास्तीत जास्त भक्तांना लाभ घेता यावा यासाठी अभिषेक पुजेचे शुल्क रु.२५/- वरुन रु.१०१/- करण्यात यावे व पुजा झालेनंतर प्रत्येक भक्ताला श्रीफळ व प्रसाद (लाडू प्रसाद १ पाकिट) दयावा. भक्तांच्या दृष्टीने खालीलप्रमाणे अभिषेक पुजा बॅचेस घेता येतील.

| अ.नं. | तपशील | वेळ |
|---|---|---|
| ०१ | १ ली बॅच | सकाळी ०७.०० ते सकाळी ०८.०० |
| ०२ | २ ली बॅच | सकाळी ०९.०० ते सकाळी १०.०० |
| ०३ | ३ ली बॅच | दुपारी १२.३० ते दुपारी ०१.३० |

एका बॅचमध्ये १५० इतके भक्त पूजेस बसू शकतील. प्रायोगीक तत्वावर अभिषेक महापूजेच्या सध्या तीन बॅचेस सुरु करता येतील. भक्तांचा प्रतिसाद पाहता पुढेमागे आणखी दोन बॅचेस वाढविता येतील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, अभिषेक पूजेकरिता उपरोक्तप्रमाणे तीन बॅचेस करण्यात याव्यात. तसेच अभिषेक शुल्क रुपये २५/- ऐवजी रुपये १०१/- करण्यात यावे व पुजा झालेनंतर प्रत्येक भक्ताला श्रीफळ व लाडू प्रसाद १ पाकिट देण्यात यावे असें ठरलें.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी/अधिक्षक मंदीर विभाग/कॅन्टीन विभाग प्रमुख)

**विषय नं.३०** **प्रसादालयातील चपात्या (पोळी) तयार करणेसाठी ठेकेदाराची नियुक्ती करणेबाबत**

**निर्णय क्र.१९८** प्रसादालयामध्ये प्रसादभोजन घेणा-या साईभक्तांना चांगल्या प्रतीच्या चपात्या मिळाव्यात. म्हणून सन १९९९ पासून चपात्या बनविण्याचे काम उक्ते टेंडरपध्दतीने देण्यात येत आहे. सन १९९९ पासून सदर काम श्री प्रेमशंकर हरीशंकर जोशी, साळंगपूर, राजस्थान यांना देण्यात आलेले आहे. याकामी सन २००७-२००८ मध्ये चपाती बनवून देण्यासाठी प्रति क्विंटल आटा + मैद्यासाठी रु. ४१८ /- अधिक नियमानुसार सर्व्हिस टॅक्स असा दर देण्यात आलेला आहे. याशिवाय त्यांचेकडील कामगारांना

निवास,दोन वेळ भोजन व दोन वेळ चहा विनामुल्य देण्यात येत आहे. सदर टेंडरची मुदत दिनांक ३१/०३/२००८ रोजी संपत आहे.

चपाती बनविणारे ठेकेदार श्री प्रेमशंकर जोशी यांचे नेमणूकीपासून आजतागायत त्यांचे काम समाधानकारक आहे. प्रसादालयात प्रसाद भोजन घेण्यासाठी येणा-या साईभक्तांचे संख्येच्या प्रमाणात ते आवश्यक तेवढया चपात्या/पु-या बनवून देत आहेत. भक्तांच्या प्रचंड गर्दीत त्यांनी कधीही चपाती / पुरी कमी पडू दिलेली नाही. त्यांचे टेंडरची मुदत दिनांक ३१/०३/२००८ रोजी संपणार असल्याने पुढील एक वर्षाचे मुदतीकरीता काम करण्यास तयार आहेत काय याबाबत समक्ष बोलावून त्यांना विचारणा केली असता त्यांनी काम करणेस तयार असलेबाबत दिं.०४/०२/२००८ चे अर्जाव्दारे कळविलेले आहे. मात्र सद्यपरिस्थीतीत रोजंदारीचे दर वाढल्याने सध्याचे दरामध्ये २०% वाढ व नियमाप्रमाणे सर्व्हीस टॅक्सची रक्कम संस्थानने द्यावी अशी त्यांनी मागणी केलेली आहे.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | कामाचे स्वरुप | सध्याचा दर | मागणी केलेला दर (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री प्रेमशंकर हरीशंकर जोशी | चपात्या / पु-या बनविणे | रु.४१८/- प्रति क्विंटल (आटा+मैदा) | सद्याचा-४१८.०० (२०% वाढ) ८३.६० = ५०१.६० | पूर्वीपासून कामगारांना मोफत भोजन,चहा, निवास दिले जात आहे. तसेच सर्व्हीस टॅक्स लागू झाल्यास संस्थानने द्यावा. |

तरी सदरचे ठेकेदार यांना दिनांक ०१/०४/२००८ पासून पुढील १ वर्षे कालावधीसाठी चपात्या, पुरी बनविणेकामी दरवाढीसह मुदतवाढ देणेस **अथवा** दिनांक ०१/०४/२००८ पासून पुढील १ वर्ष कालावधीसाठी नवीन ठेकेदार नियुक्तीसाठी वृत्तपत्रात जाहिरात देउन निवीदा मागणी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, चपाती बनविणारे ठेकेदार श्री प्रेमशंकर हरीशंकर जोशी, साळंगपूर, राजस्थान यांनी मागणी केलेप्रमाणे सद्यपरिस्थीतीत रोजंदारीचे दर वाढल्याने, सध्याचे दरामध्ये २०% (रुपये ५०१.००) वाढ व नियमाप्रमाणे सर्व्हीस टॅक्सची रक्कम संस्थानने द्यावी अशी केलेली विनंती मान्य करण्यात येऊन त्यांना दिनांक ०१/०४/२००८ पासून पुढील १ वर्षे कालावधीसाठी चपात्या, पुरी बनविणेकामी दरवाढीसह मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**विषय न.३१** **मोतीचुर लाडू प्रसाद व बर्फी तयार करणेसाठी ठेकेदाराची नियुक्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.१९९** श्री साईभक्तांना संस्थानमध्ये बनविलेला मोतीचूर लाडू प्रसाद प्रति पाकीट रु.१०/- ( ५० ग्रॅमचे ३ नग) या सवलतीचे दराने विक्री करण्यात येतो. त्याचप्रमाणे समाधी मंदीराकडून येणा-या नारळातील खोबरे काढून त्यात रवा, साखर, मैदा, घालून तयार केलेली बर्फी साईभक्तांचे भोजनामध्ये गोड पदार्थ म्हणून देण्यात येत आहे. सन २००३ पासून मोतीचूर लाडू व बर्फी बनविण्याचे काम टेंडर पध्दतीने श्री माधव गंगाराम नाईकवाडी यांना दिलेले आहे. श्री नाईकवाडी हे सन २००३ पासून समाधानकारक काम करीत आहेत.

सन २००७-२००८ या कालावधीसाठी मोतीचूर लाडूसाठी प्रतिहजारी रु.१२१ + नियमानूसार सर्व्हीस टॅक्स रक्कम तसेच बर्फीसाठी प्रति किलो साखरेसाठी रु.१.३० अधिक नियमानुसार सर्व्हिस टॅक्स् या दराने काम देण्यात आलेले आहे. तसेच त्यांचेकडील कामगारांना दोन वेळ भोजन व चहा मोफत देण्यात येत आहे. निवासाकरीता साईउद्यान इमारतीमधील २ खोल्या प्रचलित दराने सेवा आकार वसूल करुन देण्यात आलेल्या आहेत. श्री नाईकवाडी ३ उत्सवाचे व ३ श्रमपरिहार भोजनाचे मिष्टान्न मोफत बनवून देत आहेत.

श्री नाईकवाडी यांना दिलेल्या मोतीचूर लाडू / बर्फी टेंडरची मुदत दि.३१/३/२००८ रोजी संपत असून दि.३१/३/२००८ नंतर पुढील वर्षाचे कालावधीसाठी काम करण्यास तयार आहात काय? याबाबत समक्ष बोलावून विचारणा केली असता त्यांनी सध्याचे आहे त्या दरात पुढील एक वर्षाचे कालावधीमध्ये काम करण्यास तयार असल्याचे दि. १४/०१/२००८ चे अर्जाद्वारे कळविलेले आहे.

| **अ.नं** | **ठेकेदाराचे नाव** | **कामाचे स्वरुप** | **सध्याचा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. माधव गंगाराम नाईकवाडी रा.अंदरसुल, ता. येवला. | १) मोतीचूर लाडू बनविणे व पॅकींग करुन देणे. २) बर्फी बनविणे | रु.१२१/ प्रति हजारी लाडू रु.१.३० प्रति किलो साखरेस मजूरी | कामगारांना भोजन, चहा मोफत व निवास व्यवस्था भक्तांसाठी असलेल्या प्रचलित दराने सेवा आकार घेउन करण्यात येते. ती चालू ठेवावी. तसेच सर्व्हीस टॅक्स नियमाप्रमाणे मिळावा. |

तरी सदरचे ठेकेदार यांना दि.०१/०४/२००८ पासून १ वर्ष कालावधीसाठी मोतीचूर लाडू / बर्फी बनविणेकामी सध्याचे दरात मुदतवाढ देणेस **अथवा** दि.०१/०४/२००८ पासून पुढील १ वर्ष

कालावधीसाठी नविन ठेकेदार नियुक्तीसाठी वृत्तपत्रात जाहिरात देउन निवीदा मागणी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन मोतीचुर लाडू प्रसाद व बर्फी बनविणेकामी श्री. माधव गंगाराम नाईकवाडी रा.अंदरसुल, ता. येवला पूर्वीचेच अटी-शर्तीवर दि.०१/०४/२००८ पासून १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी,असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**विषय नं.३२** **अन्नपाकिटे (नाष्टा पाकिट) तयार करणेसाठी ठेकेदाराची नियुक्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.२००** साईभक्तांना सकाळी ७.०० ते १०.०० या वेळेत प्रति पाकीट रु.३.०० प्रमाणे सवलतीचे दरात नाष्टापाकीटाची विक्री करण्यात येत आहे. एका नाष्टा पाकीटात ५ पु-या , सुकी भाजी (ऊसळ) व गोड पदार्थ म्हणून बर्फी वडी देण्यात येत आहे. सदर पदार्थ बनविणे व प्लास्टीक पिशवीत वेगवेगळे भरुन नाष्टापाकीटे तयार करावी लागतात. सन २००५ पासून नाष्टापाकीटे बनविणेचे काम सौ. रोहिणी राजेंद्र कोते व्दारा, श्रीसाईबाबा समाज विकास संस्था , शिर्डी या बचतगटास उक्ते टेंडरपध्दतीने देण्यात आलेले आहे. सन २००७-२००८ या कालावधीसाठी प्रति पाकीटास ००/५५ पैसे अधिक नियमानुसार सर्व्हिस टॅक्स असा दर दिलेला आहे. याशिवाय त्यांचे कामगारांना एक वेळ भोजन व चहा मोफत देण्यात येतो. सदर टेंडरची मुदत दिनांक ३१/०३/२००८ रोजी संपणार असल्याने पुढील एक वर्षाचे मुदतीकरीता काम करण्यास तयार आहेत काय? याबाबत समक्ष बोलावून विचारणा केली असता त्यांनी काम करणेस तयार असलेबाबत दिनांक ०७/०२/२००८ चे अर्जाव्दारे कळविलेले आहे. मात्र सध्याचे प्रति पाकीटास ००/५५ पैसे ऐवजी ००/७५ पैसे मजूरी मिळावी व नियमानुसार सर्व्हीस टॅक्स संस्थानने द्यावा अशी विनंती केलेली आहे.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | कामाचे स्वरुप | सध्याचा दर | मागणी केलेला दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | सौ. रोहिणी राजेंद्र कोते व्दारा , श्री साईबाबा समाज विकास संस्था , शिर्डी | पुरी,भाजी बनविणे व पॅकींग करणे (नाष्टापाकीट बनविणे) | ००/५५ पै. | ००.७५ पैसे सुमारे ३६.३६% वाढ | कामगारांना एक वेळ मोफत भोजन ,चहा दिले जाते ते मिळावे. तसेच सर्व्हीस टॅक्स नियमानुसार संस्थानकडून मिळावा. |

तरी सदरचे ठेकेदार यांना दिनांक ०१/०४/२००८ पासून पुढील १ वर्ष कालावधीसाठी नाष्टापाकीटे बनविणेकामी दरवाढीसह मुदतवाढ देणेस **अथवा** दिनांक ०१/०४/२००८ पासून पुढील १ वर्ष कालावधीसाठी नवीन ठेकेदार नियुक्तीसाठी वृत्तपत्रात जाहिरात देउन निवीदा मागणी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, अन्न पाकिटे (नाष्टा पाकिटे) तयार करणेसाठी पूर्वीचे ठेकेदार सौ. रोहिणी राजेंद्र कोते व्दारा, श्रीसाईबाबा समाज विकास संस्था, शिर्डी यांना सध्याचे दरामध्ये २० % वाढ (प्रति पाकीटास ००/६५ पैसे मजूरी) अधिक पूर्वीच्या सवलतीसह या दराने दिनांक १.४.२००८ पासून एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी. त्यांना हे मान्य नसल्यास,याकामी निविदा मागविण्यात याव्यात असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**विषय नं.३३** **औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचा प्रशिक्षणार्थी भारतात सर्वप्रथम आल्याबाबत**

**निर्णय क्र.२०१** केंद्रशासनाच्या श्रम मंत्रालया अंतर्गत डायरेक्टोरेट जनरल ऑफ एम्लायमेंट ॲण्ड ट्रेनिंग विभागाच्या शिल्प कारागीर प्रशिक्षण योजने अंतर्गत देशातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा कार्यक्रम राबविला जातो व यशस्वी प्रशिक्षणार्थ्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र (नॅशनल ट्रेड सर्टिफीकेट) प्रदान करण्यात येते.

अखिल भारतीय व्यवसाय परिक्षेमध्ये संस्थेतून व संबंधित व्यवसायातून (ट्रेडमधून) प्रथम येणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांची राज्य शासनामार्फत जिल्हास्तर, विभागीयस्तर व राज्यस्तरावर तसेच केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय स्तरावर कौशल्य स्पर्धा घेण्यात येतात. त्या खालील क्रमानुसार-

०१. जिल्हास्तर कौशल्य स्पर्धेमध्ये प्रथम व व्दितीय येणारे प्रशिक्षणार्थी विभागीयस्तर कौशल्य स्पर्धेस पात्र ठरतात.

०२. विभागीयस्तर कौशल्य स्पर्धेमध्ये त्या-त्या विभागातून प्रथम किंवा व्दितीय येणारे प्रशिक्षणार्थी राज्य स्तरीय कौशल्य स्पर्धा परिक्षेसाठी पात्र ठरतात.

०३. राज्यस्तर कौशल्य स्पर्धेमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यास राष्ट्रीय कोशल्य स्पर्धा परिक्षेसाठी महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करण्याची संधी मिळते.

०४.राष्ट्रीय कोशल्य स्पर्धा परिक्षेमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यास त्या वर्षातील व त्या व्यवसायातील देशातील सर्वोत्कृष्ट कारागीर (Best Craftsfman in India) पुरस्कार प्राप्त होतो. यामध्ये रोख रु.१०,०००/- (रु.दहा हजार) व प्रशस्ती पत्र श्रम मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून प्रदान करण्यात येते.

संस्थेच्या स्थापनेपासून २४ वर्षात प्रथमच चालूवर्षी आपल्या संस्थेचा जुलै- २००६ चा टर्नर ट्रेडचा प्रशिक्षणार्थी कु.तुरकणे वाल्मिक पुंजाभाऊ हा लुधियाना (पंजाब) येथे झालेल्या ४३ व्या राष्ट्रीय

कौशल्य स्पर्धा परिक्षेमध्ये सर्व प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन भारतात सर्व प्रथम आलेला आहे, असे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई येथील अधिकारी मा.श्री.ए.जी. पवार यांनी दि.१६.०१.२००८ रोजी दूरध्वनीवरुन कळविले आहे.

पिंपळवाडी सारख्या छोटया गावात शेतकरी कुटूंबात जन्मलेल्या व दहावी इयत्तेत ५७ टक्के गुणांनी व्दितीय श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या या विद्यार्थ्याचे राष्ट्रीय पातळीवर मिळविलेले हे घवघवीत यश अत्यंत उल्लेखनीय आहे. शालेय जिवनात साधारण गुणवत्तेत असणारे विद्यार्थी त्यापुढील काळात मिळालेल्या संधीचा योग्य उपयोग करुन आपल्यातील विशिष्ट गुणवत्ता शिध्द करुन शकतात असा संदो समाजासाठी या विद्यार्थ्याच्या यशातून मिळत असून संबंधितांना तो मार्गदर्शक, आश्वासक व निश्चितपणे प्रेरणादायी ठरणार असा आहे.

सदर प्रशिक्षणार्थ्यांची संस्थेतील व्यवसाय तुकडी श्री.एल.एम.सुर्यवंशी, टर्नर निदेशक यांनी सांभाळली असून त्यांचे मार्गदर्शन व मेहनत या यशासाठी उपयुक्त ठरले आहे. त्यांना गणित व चित्रकला निदेशकांचे सहकार्य लाभले.

वरील यश हे श्री साईबाबा संस्थानचे मा.व्यवस्थापन समिती, मा.कार्यकारी अधिकारी, मा.प्रशासकिय अधिकारी (शैक्षणिक संकुल) यांचे बहुमोल मार्गदर्शनामुळे व माझे सर्व सहकारी यांच्या सहकार्यातून प्राप्त झाले आहे, असे प्राचार्य श्री साईबाबा औ. प्र. केंद्र यांनी कळविले आहे.

राष्ट्रीय पातळीवरील यश ही अत्यंत गौरवास्पद बाब असून यशस्वी विद्यार्थी, संबंधीत सर्व निदेशक व प्राचार्य यांचा यथोचित सत्कार व्हावा व सदर वृत्त श्री साईलिला मासिकातून व वृत्तपत्रात प्रसिध्द करणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,कु.तुरकणे वाल्मिक पुंजाभाऊ यांना व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे बोलविण्यात येऊन,त्यांचा यथोचित सत्कार करण्यात यावा व संस्थानतर्फे त्यांना रुपये ११,०००/- मात्रचे पारितोषिक देण्यात यावे,असें ठरलें. (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

**विषय नं.३४** **नवीन कॅश व्हॅन खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.२०२** श्रीसाईबाबांचे मंदीरात व परिसरात दक्षिणापेटया (हुंड्या) ठेवण्यात आलेल्या आहेत. सदर दक्षिणापेट्यामध्ये जमा होणारी रक्कम दक्षिणा पेटया उघडुन एकत्रित करून संस्थान अधिकारी, कर्मचारी यांचे मार्फत मा. धर्मदाय आयुक्त यांचे प्रतिनिधी व बॅक अधिकारी यांचे उपस्थितीत मोजणी करण्यात येते, हे मोजणी काम प्रति आठवडयात दोन वेळा करण्यात येवुन कॅश मोजणीचे काम पुर्ण झालेवर सदरची रक्कम बॅकेत पोहच करण्यात येते. रक्कम पोहच करणेसाठी लेखाशाखेच्या मागणीनुसार, संस्थान वाहन पुरविण्यात येते.

बॅकेत रक्कम जमा करणेसाठी संस्थानकडे उपलब्ध असलेल्या दोन टाटा४०७ रुग्णवाहिकांपैकी प्राप्त परिस्थितीत उपलब्ध असलेली रूग्णवाहिका या कामासाठी देण्यात येते. परंतु, एखादे दिवशी रूग्णवाहिका आदल्या दिवशीच बाहेरगावी गेलेली असल्यास अथवा रूग्णवाहिकांना रूग्णालयासंबंधी कामे असल्यास बॅकेत रक्कम पोहच/जमा करणेसाठी वाहन उपलब्ध करून देणेस अडचण येते व अशावेळी वाहन उपलब्ध होई पर्यंत नाईलाजाने रक्कम राखुन ठेवावी लागते.

तसेच दक्षिणापेटंयामधुन निघणारे सोने, परकिय चलन मुंबई /नाशिक येथे घेऊन जाणे, मुंबई येथून सोन्याचे नाणे तयार करून आणणे या कारणासाठी इतर संस्थान वाहनांचा वापर करावा लागतो.

सध्य परिस्थीती विचारात घेता रूग्णवाहिकामधुन मोठया प्रमाणात रक्कम पोहच करणे तसेच कार्यालयीन वाहनांतुन सोने, चांदी ने-आण करणे हे काम अत्यंत जबाबदारीचे व धोक्याचे आहे.

उपरोक्त परिस्थीती विचारात घेता दक्षिणापेटंयामधुन एकत्रित जमा होणारी रक्कम बॅकेत पोहच करणे, तसेच सोने, परकिय चलन नेणे कामी एक नवीन कॅश व्हॅन खरेदी करणे आवश्यक आहे.

या करीता टाटा कंपनीचे ४०७ मॉडेलची चेसी खरेदी करून बॉडी बिल्डर यांचेकडून आपणास आवश्यक आहे तशी (आपले मागणीनुसार) बॉडी बांधणी करून घेता येईल. यासाठी अंदाजे रू.७,५०,०००/- (रू.सात लाख पन्नास हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे. ४०७ मॉडेलचे टाटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून चेसीचे तसेच बॉडीबिल्डर यांचेकडून बॉडी बांधणीचे कोटेशन घेऊन सदरची खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभाग)

**विषय नं.३५** **संस्थानच्या साईनिवास अतिथीगृहावरील सोलर सिस्टिमच्या टाक्या बदलणेबाबत.**

**निर्णय क्र.२०३** संस्थानच्या साईनिवास अतिथीगृहात उतरणाऱ्या श्री साईभक्तांना स्नानासाठी गरम पाणी मिळण्यासाठी जैन इरिगेशन सिस्टिम, जळगांव यांची ५००० लिटर ( एकत्रित ) क्षमतेची सोलर वॉटर हिटींग सिस्टिम बसविण्यात आलेली आहे.

या सिस्टीममधील २५०० लिटरची एक व १००० लिटरची एक अशा दोन गरम पाण्याच्या टाक्या खराब झाल्या असून त्या रिप्लेस करून त्या ठिकाणी दुसऱ्या टाक्या त्वरीत बसवाव्या लागणार आहेत. यासाठी मे. जैन इरिगेशन सिस्टिम, जळगांव यांचे प्रतिनिधीला समक्ष पाहणीसाठी बोलाविले

असता त्यांनी दिनांक ११-०२-२००८ रोजी पाहणी करून दुरुस्तीचे इस्टिमेट पाठविले असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | क्षमता लिटर्स | संख्या | रक्कम | किंमत |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | गरम पाण्याची टाकी | १००० | ०२ नग | ६०,०००.०० | १,२०,०००.०० |
| ०२) | गरम पाण्याची टाकी | १५०० | ०१ नग | ९०,०००.०० | ९०,०००.०० |
| | | | | **(अ)** एकुण रुपये- | **२,१०,०००.००** |
| | वजा जुन्या टाक्यांची किंमत | | | ( बाय - बॅक) | |
| | | १००० लिटर्स | ०१ नग | १४,०००.०० | १४,०००.०० |
| | | २५०० लिटर्स | ०१ नग | २०,०००.०० | २०,०००.०० |
| | | | | (ब) एकुण रुपये- | **३४,०००.००** |
| | | | | निव्वळ किंमत रुपये **अ** वजा **ब** | **१,७६,०००.००** |

या किंमतीत सर्व टॅक्सेसचा समावेश असून टाकीसंबंधी असणाऱ्या सर्व कामांचा (इन्सुलेशन वर्क-पाण्याचे कनेक्शन वगैरे ) समावेश आहे.

तरी वरीलप्रमाणे दुरुस्तीचे काम मे. जैन इरिगेशन सिस्टिम, जळगांव यांचेकडून करवून घेणेस व येणाऱ्या रु. १,७६,०००.०० इतक्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं.३६** **महारोगी सेवा समिती वरोरा, जि.चंद्रपूर यांना मंजूर असलेली रक्कम देणेबाबत.**

**निर्णय क्र.२०४** श्री.कौस्तुभ आमटे,सचिव,महारोगी सेवा समिती,आनंदवन,वरोरा,जि.चंद्रपुर, यांनी दि.०३/०१/२००७ व दि.०९/०५/२००७ चे पत्रान्वये , चेतना अभियान व आनंदवन प्रकल्पासाठी महारोग्यांचे पुनर्वसन व कल्याणार्थ राबविण्यात येणा-या विविध उपक्रमातील शेती,पाणीपुरवठा,पेशंटची वहातूक,तसेच महारोग्यांच्या कल्याणार्थ विविध प्रकारची वाहने व इतर साहित्य खरेदी करीता आर्थिक मदत मिळावा, अशी विनंती केलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ चे सभेतील निर्णय क्र.१७५ अन्वये, चेतना अभियान व आनंदवन प्रकल्पासाठी एकत्रित रुपये एक कोटी आर्थिक सहाय्य देण्यास मान्यता दिलेली आहे.

शासनाने त्यांचे दि.१८ जुन २००७ चे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांच्या विश्वस्त निधीतुन महारोगी सेवा समिती, आनंदवन,ता.वरोरा,जि.चंद्रपुर यांना प्रस्तावीत चेतना अभीयानासाठी तसेच आनंदवन प्रकल्पासाठी एकत्रितपणे रु.१ कोटी (रुपये एक कोटी फक्त) इतके अर्थ सहाय्य करण्यास श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७ (२)(ण) मधील तरतुदीस अनुसरुन शासन मान्यता देण्यात येत आहे. मात्र सदर निधी टप्प्याटप्प्याने वितरित करण्यात यावा व त्यांना अदा करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र तपशिलासह प्राप्त करुन त्याची प्रत शासनास सादर करावी, असे निर्देश दिलेले आहेत. यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०७/२००७ चे सभेत चर्चा होऊन,आर्थिक मदतीचा पहीला हप्ता / टप्पा म्हणुन रु.५० लाख देणेचा निर्णय झालेला आहे.

वरीलप्रमाणे आर्थिक मदतीचा पहीला हप्ता रु.५० लाख मात्रचा युनियन बँक ऑफ इंडिया शाखा शिर्डी या बँकेचा, डी.डी.क्र.०७८३९३२ दि.३०/०७/२००७, मा.मुख्यमंत्री महोदय महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते दि.०१/०८/२००७ रोजी विधान भवन,मुंबई येथे देण्यात आलेला आहे.

श्री आमटे यांनी त्यांचे दि.१९/११/२००७ चे पत्रान्वये रु.५०,०२,१६६/- किंमतीचे खालील प्रमाणे साहीत्य खरेदी केलेले असल्याचे कळविले आहे.

| अ.नं | | वस्तुचे / साधनाचे नांव | नग/ संख्या | किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | a | महिंद्रा ट्रॅक्टर अर्जुन | २ | १०५००००=०० |
| | b | महिद्रा ट्रॅक्टर ५७५ डी.आय. | १ | ४९८५००=०० |
| | c | महिद्रा ट्रॅक्टर ४७५ डी.आय. | १ | ४७५५००=०० |
| | d | जॉन ५१०३ इकॉनॉमी ट्रॅक्टर | १ | ४५१८००=०० |
| | e | हायड्रोलिक ट्रेलर | १ | २११९४२=०० |
| | f | शेती अवजारे | २ | १६२०००=०० |
| | G | आर.टी.ओ. रजिस्ट्रेशन खर्च ट्रॅक्टर | - | ३८०००=०० |
| | G | आर.टी.ओ. रजिस्ट्रेशन खर्च ट्रेलर | - | ३८५००=०० |
| | h | आर.टी.ओ. रजिस्ट्रेशन खर्च जॉन ट्रॅक्टर | - | ८२४८=०० |
| २ | **जनरेटर सेट** | | | |
| | a) पॉवेरिका ५० केव्हीअे डीजी सेट | | १ | ३७३४१९=०० |
| | b) होंडा २८५०० जन सेट | | ३ | १७८३१४=०० |
| ३ | **वॉटर कुलर-** | | | |
| | a) ब्ल्युस्टार एसडीएलएक्स ४८० | | ३ | ९६११७=०० |
| | b) ब्ल्युस्टार एसडीएलएक्स ८१२० | | २ | ८३४९६=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | **डिझेल इंजिन-**<br>किर्लोस्कर अेव्ही १ डिझेल इंजिन | ९ | २२५४०५=०० |
| ५ | **बोलोरो व बोलोरो पीक-अम**<br>a) बोलेरो एमयुव्ही<br>b) बोलेरो पीक -अप<br>c) आर टी ओ रजिस्ट्रेशन खर्च | <br>१<br>१<br>- | <br>५२३५००=००<br>४६४५००=००<br>१२२९२५=०० |
| | **एकुण रुपये-** | | **५००२१६६=००** |

महारोगी समितीने वरील झालेला खर्च लेखापरिक्षक यांचेकडुन तपासुन घेतलेला असल्याचे लेखापरिक्षकाचे पत्र व उपयोगिता प्रमाणपत्र (युटीलायझेशन सर्टिफिकेट) इकडेस सादर केलेले आहे.

उर्वरित रक्कम मार्च २००८ पुर्वी अदा करणे शासनाने बंधनकारक केलेले असल्यामुळे त्यांना उर्वरित रक्कम रुपये ५० लाख (रुपये पन्नास लाख) अदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, महारोगी सेवा समिती, आनंदवन,ता.वरोरा,जि.चंद्रपुर यांना द्यावयाचे उर्वरित रुपये ५० लाख रकमेचा चेक मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे हस्ते देण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.३७** **मुलामुलींचे निरीक्षणगृह (रिमांड होम) अहमदनगर यांना आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.२०५** मा.अध्यक्ष तथा जिल्हादंडाधिकारी , डिस्ट्रिक्ट प्रोबेशन ॲण्ड आफ्टर केअर असोसिएशन संचलित, मुलामुलींचे निरीक्षण गृह व बालगृह,अहमदनगर,यांनी दि.१४/१२/२००५ चे पत्रान्वये, मुलामुलींचे निरीक्षण गृह व बालगृहाचे शयनकक्ष, बंदीकक्ष, अभ्यासिका, वाचनालय कक्ष, डिस्पेन्सरी रुम, स्वच्छतागृह, स्नानगृह व इतर बांधकामासाठी रुपये ७९ लाख आर्थिक मदतीची मागणी केलेली आहे.'

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/१२/२००५ चे सभेत रिमांड होमच्या बांधकामासाठी रुपये ५० लाख मदत देण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास शासन पत्र क्र.संकिर्ण २००७/१५२(५०/०७) का.सोळा,मंत्रालय मुंबई,दि.२० जुलै २००७ अन्वये, श्री साईबाबा संस्थान यांचे विश्वस्तनिधीतुन डिस्ट्रिक्ट प्रोबेशन ॲण्ड आफ्टर केअर असोसिएशन संचलित,मुलामुलींचे निरीक्षण गृह व बालगृह यांना विस्तारीत बांधकाम प्रकल्पासाठी रु.५० लाख (पन्नास लाख फक्त) इतका निधी श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. मात्र सदर संस्थेकडुन बांधकाम प्रकल्प इत्यादीबाबत तपशिलवार अहवाल आल्यानंतर मंजुर अर्थसहाय्य अदा करण्यात यावे, तसेच श्री साईबाबा संस्थान शिर्डी व्यवस्थापन समितीस कामाच्या प्रगतीवर देखरेख करण्याचा अधिकार असेल. तसेच सदर प्रकल्पाचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर सदर संस्थेकडुन उपयोगीता प्रमाणपत्र घेऊन शासनास सादर करावे, असे कळविले आहे.

त्यास अनुसरुन रिमांड होम अहमदनगर यांनी इकडेस दि.०३/०१/२००८ व दि.२५/०१/२००८ रोजी रु.६५,७१,०००/- खर्चाचे ४ प्रस्तावाचे कागदपत्र सादर केलेले आहे.

शासनाने रु.५० लाख आर्थिक मदतीची रक्कम सन २००७-२००८ च्या निधीतुन खर्च करणेबाबत कळविले आहे. त्यास अनुसरुन सदरच्या संस्थेस आर्थिक मदतीची रक्कम दि.३१ मार्च २००८ चे अगोदर देणे बंधनकारक असल्याने आर्थिक मदत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तरचर्चा होऊन, सदर बांधकामासाठी मुलामुलींचे निरीक्षणगृह (रिमांड होम) अहमदनगर हे स्वतःचा किती निधी खर्च करणार याबाबत त्यांचेकडून तपशिल मागविण्यात यावा व टप्प्याटप्प्याने निधी देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०३)

**विषय नं.३८** **चि.पृथ्वीराज औताडे, पुणे यांना जलतरण मोहिमेसाठी आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.२०६** श्री.प्रदिप शंकरराव औताडे, पुणे यांनी त्यांचे दि.१४/०१/२००८ चे पत्रान्वये, आमचा धाकटा बंधु चि.पृथ्वीराज वय १२ वर्षे हा जलतरण पटु असून, त्याने वयाचे १० वर्षापासून सागरी जलतरण मोहीमेत भाग घेऊन नविन विक्रम प्रस्थापित केले आहेत.

चि.पृथ्वीराजने सन २००५-२००६ पासून खालील ठिकाणी मोहीमा यशस्वीरित्या पुर्ण केल्या आहेत.

१) एलीफंटा ते गेट वे ऑफ इंडिया - १२ सागरी मैल.

२) सन क्रॉक ते गेट वे ऑफ इंडिया - ५ सागरी मैल.

३) धरमतर ते गेट वे ऑफ इंडिया - ३५ सागरी मैल अंतर ७.२० तास हया कमी वेळात पुर्ण करुन विक्रमी नोंद केली आहे.

चि.पृथ्वीराज दि.२८/०५/२००८ रोजी साऊथ आफ्रिकामध्ये अटालांटिक महारागरात पोहण्यास जाणार आहे. तेथे ५-६ जलतरण मोहीमा करणार आहे. या मोहीमांच्या यशानंतर तो आशिया खंडातील सर्वात लहान पटु म्हणुन सन्मानीत होईल. सदरच्या मोहिमेसाठी रुपये २ लाख ५५ हजार खर्च

येणार आहे. त्यासाठी संस्थानमार्फत आर्थिक मदत मिळणेस विनंती केली आहे. मा.अध्यक्ष, श्री.ससाणे सो. यांनी प्रस्ताव मिटींग पूढे ठेवण्याचे निर्देश दिलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) दोन "छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाचे मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे."

यावर सविस्तर चर्चा होऊन,चि.पृथ्वीराज औताडे,पुणे यांना रुपये १ लाख आर्थिक मदत देणेकामी छाननी समितीची मंजुरी घेऊन प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा,असें ठरलें.

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०३)

**विषय न.३९** **श्री.आण्णासाहेब गो.गागरे,राहूरी यांचे पाल्यांना बुध्दीबळ खेळासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.२०७** मा.श्री वाबळे सो.विश्वस्त,श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी १३/०२/२००७ चे पत्रान्वये व मा.श्री कोल्हे सो.उपाध्यक्ष यांनी दि.१६/०२/२००७ चे पत्रान्वये डॉ.आण्णासो.गोरखनाथ गागरे,राहुरी यांचे पाल्ये कु.शार्दुल व कु.शाल्मली यांची दुबई व तुर्की येथे होणा-या आशियायी व जागतीक स्पर्धेसाठी भारतातर्फे निवड झालेली असून त्यांना आंतरराष्ट्रीय मास्टर व ग्रँडमास्टर प्रशिक्षणाची अत्यंत गरज आहे. तरी त्यांना आर्थिक मदत देणेबाबत शिफारस करत आहे. असे कळविले आहे. श्री गोरे यांनी त्यांचे पत्रात "माझा मुलगा कु.शार्दुल वय ९ वर्ष हा आंतरराष्ट्रीय बुध्दीबळपटू आहे त्याने सतत ३ वर्षे राज्यात प्रथम क्रमांक मिळवला असुन सन २००४ मध्ये देशात प्रथम आला आहे.सन २००५ मध्ये आशियायी स्पर्धेत भारताचे पतिनिधित्व केले आहे.सन २००६ मध्ये देशात ९ वर्षाखालील गटात ३ रा व ११ वर्षाखालील गटात ६ वा आला आहे. तसेच मुलगी कु.शाल्मली वय वर्षे १२ ही देखील आंतरराष्ट्रीय बुध्दीबळपटु आहे. ती सन २००६ मध्ये राष्ट्रीय स्पर्धेत देशात दुसरी आली आहे. सन २००७ मध्ये तुर्की येथे होणा-या स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

राहुरी सारख्या ग्रामीण भागातुन शार्दुल व शाल्मली हे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतीनिधित्व करत आहेत. त्यासाठी त्यांना आंतरराष्ट्रीय मास्टर व ग्रँडमास्टर प्रशिक्षणाची अत्यंत गरज आहे. तसेच लॅपटॉप व काही सॉफ्टवेअर देखील आवश्यक आहेत. हया सर्व गोष्टी अत्यंत खर्चिक आहेत तरी आपण यांची योग्य दखल घेवून आवश्यक ती आर्थिक मदत करण्यात यावी," अशी विनंती केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.आण्णासो.गोरखनाथ गागरे,राहुरी यांचे पाल्ये कु.शार्दुल व कु.शाल्मली यांना आंतरराष्ट्रीय मास्टर व ग्रँडमास्टर प्रशिक्षणासाठी प्रत्येकी रुपये १ लाख आर्थिक मदत देणेकामी छाननी समितीची मंजुरी घेऊन प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, असें ठरलें. (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०३)

**विषय नं.४०** **विश्वकर्मा मंदिर, शिर्डी सभामंडपाचे बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.२०८** श्री.हिरामण वामन वारुळे, अध्यक्ष,विश्वकर्मा गाडी लोहार विकास मंडळ,शिर्डी यांनी त्यांचे दि.०२/१०/२००७ चे पत्रान्वये, आम्ही कनकुरी रोड शिर्डी येथे श्री विश्वकर्मा मंदिराचे बांधकाम करीत असुन ते लवकरच पुर्ण होत आहे. मात्र आर्थिक अडचणीमुळे सभामंडपाचे काम बंद आहे.
श्री विश्वकर्मा मंदिर हे कनकुरी रोड लगत असून उत्सव काळात येणाऱ्या पालख्या हया रस्त्यावरुन येत असल्याने सभामंडप झाल्यास सदरच्या पालख्या या ठिकाणी थांबु शकतील. त्यामुळे उत्सव काळात संस्थानवरील थोडा भार कमी होईल. तसेच गोरगरिबांचे मंगलकार्य पार पाडले जातील व इतरही धार्मिक व सामाजिक कार्यक्रम होतील. तरी आम्हाला सभामंडप उभारणीसाठी आर्थिक हातभार लावावा अशी करण्यात आलेली विनंती अमान्य करण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४१** **डॉ.आर.जी.ढवळे,वैद्यकीय संचालक, यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.२०९** डॉ.आर.जी. ढवळे यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/१७११६/२००६ दि.०९/१२/२००६ अन्वये व जा.नं. एसएसएस/वशी-०१/५०९०/२००७ दि.२९/०३/२००७ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटलकडे वैद्यकिय संचालक या पदावर प्रथम सहा महिन्यांसाठी नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.१/१२/२००६ रोजी कामावर हजर झाले आहेत.

उपरोक्त मुदत संपलेवर जा.नं एसएसएस/वशी-०१/१३६१/२००७ दि.३१/०५/२००७ अन्वये त्यांना सहा महिने मुदतवाढ देण्यात आली. दि.३१/०५/२००७ अन्वये त्यांची वाढविण्यात आलेली सहा महिन्यांची मुदत दि.३०/११/२००७ रोजी संपुष्ठात आल्याने व्यवस्थापन समितीचे दिनांक ८.१२.२००७ चे सभेत निर्णय क्र. ८४० अन्वये त्यांना तीन महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर वाढीव कालावधीची मुदत दिनांक २९.०२.२००८ रोजी संपत असल्याने त्यांना सेवामुक्त करण्यात येऊन, त्यांचेकडे असलेला वैद्यकीय संचालक या पदाचा असलेला कार्यभार तूर्त डॉ.के.एन.टिंगरे, माजी वैद्यकीय संचालक यांचेकडे देण्यात यावा. दरम्यानचे काळात वर्तमानपत्रात

जाहिरात देऊन मुलाखतीद्वारे वैद्यकीय संचालक पदावर पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक आस्थापन)

वरील निर्णय क्र १६९ ते २०९ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (किशोर रा.मोरे) | ( शंकरराव गेणूजी कोल्हे) |
| कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष |
| श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी | श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी |